

वाघाला बाबांच्या हस्ते मुक्ति

डिसेंबर

६० पैसे

१९

# अनुक्रमणिका – डिसेंबर १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय | दत्तजयंती |
| २. साकोरीच्या पूज्य श्री गोदावरीमाता माता | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३. नामसंकीर्तन | श्री बाळकृष्ण धामणकर |
| ४. श्रद्धा व सबुरी | श्री. पांडुरंग भुजबळ, सातारा, |
| ५. श्रीसाईबाबांचा संदेश | श्री. श्रीराम सातर्डेकर |
| ६. ज्योतिषशास्त्राचा ओनामा–४ | होरालंकार शं. बा. देवधर |
| ७. साईबाबांचा महिमा | श्री. प्रकाश सहस्त्रबुद्धे |
| ८. श्री साईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ९. श्री चिद्घन स्वामी | डॉ. भालचंद्र आकलेकर |
| १०. श्रीसद्गुरुची राजधानी – नृसिंहवाडी | सुभाष चेंदवणकर |
| ११. श्री साईनाथ माऊली | श्री. रमाकांत पंडित |
| १२. मार्ग धर्म तो | लक्ष्मीतनया |
| १३. श्रीसाईनाथ, भगुरुईश्वर | श्रीधर प्रभुणे |
| १४. स्वप्न | डी. बी. पोतनीस |
| १५. सुगंध सावली | श्री. वसंत प्र. जोशी |
| १६. नित्य सुख | श्री. शाम जुवळे |
| १७. ओवी | सौ. माई रा. आडकर |
| १८. असा माझा देव | श्री विजय हजारे |
| १९. श्री साईबाबांच्या समाधिपाशी | श्री शिवाजी कौ. मोरे |
| २०. शिरडीवृत्त | |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री सा ई वा क्सु धा

शिष्यें काय कीजे स्वयें । सद्गुरुसीच लावणें सोये ।
शिष्यास न ठावे निज अपाय । नकळत उपाय गुरु करी ॥ १६ ॥
गुरुपरीस आणीक वदान्य । त्रिभुवनी पाहतां नाही अन्य ।
शरण्याचा परमशरण्य । शरण अनन्य होऊं त्या ॥ १७ ॥
उपमूं जातां चिंतामणीसीं । चिंतामणी दे चिंतितार्थासी ।
गुरु देईल अचिंत्य वस्तूसी । परमाश्चर्येसीं निजभक्ता ॥ १८ ॥
तुळूं जातां कल्पतरूसी । तों तो पुरवी कल्पितार्थांसी ।
देईल निर्विकल्पस्थितीसीं । अकल्पितेसी गुरुराय ॥ १९ ॥
कामधेनु कामिले पुरवी । गुरुधेनूची तीहून थोरवी ।
अचिंत्यदानीं ऐसी ही पदवी । कोण मिरवी तिजवीण ॥ २० ॥

श्रीसाईसच्चरित – अध्याय १६ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] डिसेंबर १९७४ [ अंक ९

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
● श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# श्रीदत्तजयंती–श्रीसाई दत्ताचा अवतार

मार्गशीर्ष शुक्ल पक्षातील पौर्णिमा ही दत्तजयंति या नावाने ओळखली जाते. या दिवशी सारे हिंदुधर्मीय औदुंबरवासी अवधूतांचे नामस्मरण, पूजन अर्चन षोडषोपचारे करून हा दिवस साजरा करतात. या दिवशी महाराष्ट्रातील नृसिंहवाडी किंवा नरसोबाची वाडी, गाणगापूर, आणि औदुंबर या पुण्यक्षेत्री दत्तभक्त, दत्तात्रय देवतेची अनन्यभावे पूजा करून तिची मोठ्या सन्मानाने पालखी काढतात.

हिंदुधर्मियांची दत्त ही देवता म्हणजे ब्रह्मा, विष्णु व महेश या तिघांच्या एकरूपतेचे प्रातिनिधिक स्वरूप असून सत्व, रज व तम या त्रैगुण्याचे एकत्रीकरणही तिच्यात झालेले आहे अशी श्रद्धा आहे. दत्त या देवतेचा उगम वेद व तदनंतरच्या कालापर्यंत गेलेला दिसून येतो. महाभारताच्या अनुशासनपर्वात, वनपर्वात व शांतिपर्वात दत्तात्रयाचा उल्लेख सापडतो. दत्त हा अनसूयेचा मानसपुत्र होता म्हणून त्याला अत्रीचाही मानसपुत्र म्हणत आणि याचमुळे त्याचे दत्तात्रेय असे नाव पडले.

दत्तात्रयाने बालपणीच वेदाध्ययन केले. नंतर वेद शिकविण्यास त्याने आरंभ केला. कालांतराने अनसूयेने त्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची विनंती केली. परंतु त्यास आपला ब्रह्मचर्याश्रमच पसंत होता. उलट त्याने अनसूयेला ब्रह्मविद्येचा उपदेश केला व तपश्चर्येसाठी घरातून जाण्याची परवानगी तिजकडून मिळविली. दत्तात्रयाने अनसूयेला केलेला उपदेश फार महत्त्वाचा आहे.

दत्त ही देवता सदैव आपल्या भक्तांच्या हाकेला ओ देणारी, त्यांनी केलेल्या घोडचुकांबद्दल, अपराधांबद्दल क्षमा करणारी, दयाळू आणि दुष्टांपासून अभय देणारी अशी देवता आहे. काही ठिकाणी तिला विष्णूचा सहावा अवतार तर काही ठिकाणी चौथा अवतार असे मानलेले आहे. तिने यज्ञक्रियांसहित वेदाना पुनर्जीवित केले चारी वर्णांची पुन्हा स्थापना केली आणि सर्वत्र पसरलेल्या अधर्माच्या अंधःकाराचा समूळ नाश केला अशी माहिती हरिवंश पुराणात मिळते. मार्कंडेय पुराणात दत्ताने जृम्भ नामक दैत्याच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या राक्षससेनेचा पराभव योगबलाने केला अशी कथा आहे; यामुळेच की काय या देवतेचे अनेक भक्त बनले. नाथ पंथातील अनेक थोर पुरुषांनी दत्त ही देवता योगातील सिद्धी देणारी देवता आहे असे मानले आहे. मत्स्येंद्रनाथांचे शिष्य गोरखनाथ यांना आपल्या योगबलाचा भारी अहंकार होता. इतका की ते आपली भिक्षाझोळीच आकाशमार्गे भिक्षेला पाठवीत असत. एकदा

दत्तात्रयांनी ती झोळी आपल्या योग सामर्थ्याने खाली पाडली. त्यामुळे दत्तात्रयाचे व गोरखनाथाचे युद्ध झाले व त्यात गोरखनाथाचा सपशेल पराभव होऊन त्याचा सर्व गर्वपरिहार झाला व शेवटी त्याने दत्तात्रेयाचा उपदेश ग्रहण केला अशी कथा आहे व ती दत्त-गोरखनाथ संवाद म्हणून प्रसिद्ध आहे.

श्रीदत्तात्रेयाच्या सर्व मूर्तीमधून व त्याच्या सर्व प्रसिद्ध चित्रांतून दिसणारी त्याची तीन तोंडे म्हणजे ब्रह्मा, विष्णू व महेश हे होत व त्यांच्या मागे असलेली गोमाता व चार श्वान ही अनुक्रमे पृथ्वी व चार वेद यांची सूचक आहेत.

दत्तात्रयाने संन्यास पद्धतीचा प्रसार-केला. आपले वडील अत्रिमुनी यांच्या आज्ञेवरून त्याने गौतमी नदीपाशी दीर्घकाल महेश्वराची आराधना केली. तेव्हा शंकर प्रसन्न झाले व त्यांनी त्यास मुक्ती व योग रहस्य समजावून सांगून आत्मज्ञान दिले. तेव्हापासून गोदावरी ( गौतमी ) जवळील भागास आत्मतीर्थ असे नाव पडले.

दत्तात्रयाचा वेदांतविषयक ग्रंथ ' दत्तगीता ' नावाने प्रसिद्ध आहे. त्याशिवाय दत्तमानस पूजा व दत्त नाममहिमा अशी अभंगरचना आहेच. दत्तसंप्रदायाचा मुख्य ग्रंथ ' गुरुचरित्र 'हा असून त्याचे कर्ते श्रीसरस्वती गंगाधर हे होत. दत्तात्रयाची ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिरुपात आणि परब्रह्म स्वरुपात उपासना केली जाते.

आपले भगवान श्रीसाईबाबा हे दत्तस्वरुपी आहेत अशी भाविकाची दृढश्रद्धा आहे. साईबाबा हे प्रथम शिर्डीत जेव्हा आले, तेव्हा तेथल्या निंबवृक्षाखालीच त्यांचे वास्तव्य होते. हे आपल्या गुरुरायाचे स्थान आहे असे ते सांगत. या ठिकाणी गुरुवारी व शुक्रवारी जो उद जाळील त्याचे कल्याण होईल असे बाबांचे सांगणे असल्याने भाविक तिथे उद जाळतातच. भगवान दत्तात्रेयाचे सारे गुण श्रीसाईबाबांचे ठायी आहेत आणि म्हणूनच की काय दत्तजयंतीच्या दिवशी दत्तभक्त मंडळी श्रीसाईबाबांचेही प्रकर्षाने नामस्मरण करतात. शिर्डीस या दिवशी हजारो भक्तमंडळी बाबांच्या दर्शनास येतात आणि श्रीदत्त व श्रीसाई महिमा यांचे समरसतेने गुणगान करतात.

# नामस्मरणरूपी शेताची मशागत

नामस्मरणरूपी शेतात उत्तम पीक येण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ते पाहा.

१ सदाचरण हे शेताचे रक्षण करण्याकरता लागणाऱ्या कुंपणासारखे आहे.

२ शुद्ध अंतःकरण म्हणजेच उत्तम काळी भुसभुशीत जमीन. या जमिनीमधले दगड, चुना, हरळी काढून साफ करावी. म्हणजे अंतःकरणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर वगैरे ठेवू नये.

३ नामस्मरण हे त्या जमिनीत पेरण्याचे बी आहे. हे बी किडके नासके नसावे. म्हणजेच नामस्मरण सकाम नसावे. उत्तम बी म्हणजे नामाकरिता नाम.

४ तीर्थक्षेत्रे संतांचे आशीर्वाद, सत्संगती कृपादृष्टी या सर्व पाटाच्या पाण्यासारख्या आहेत. यामुळे शेत चांगले यावयास मदत होते.

५ भगवत्कृपा ही पावसाच्या पाण्यासारखी आहे.
पाटाच्या पाण्यापेक्षा पावसाच्या पाण्याची गोष्ट काही और आहे. पण तो पडणे न पडणे आपल्या हातात नाही. शेताला लावण्याकरिता पाटाचे पाणी, एखादी विहीर, तलाव किंवा नदी यामधून पाणी नेता येते. परंतु पावसाच्या बाबतीत कोणाला काहीच करता येत नाही. त्यामुळे एखाद्याने मघा सांगितल्याप्रमाणे शेताची उत्तम निगा राखली, उत्तम बी पेरले तरी पावसाच्या अभावी पीक न येण्याचा संभव असतो. परंतु नामस्मरणाचे एक वैशिष्ट्य आहे, ते हे की त्याच्या अंगी लोहचुंबकासारखी आकर्षक शक्ती आहे. म्हणून हे शेत भगवत् कृपारूपी पाऊस खेचून घेऊन आपल्यावर पाडते. त्यामुळे पावसाच्या अभावी शेत वाया गेले असे कधीच होत नाही. आपण असे पाहू की, दोन शेतकरी आहेत. एक

(पान १३ वर पहा)

# साकोरी आश्रमाच्या स्वामिनी परमपूज्य श्री. गोदावरीमाता

• सदानंद चेंदवणकर

शिरडी संस्थानच्या जवळ असलेल्या साकोरीच्या श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रमाच्या सर्वस्व पूज्य श्री गोदावरीमाताजी यांची एकषष्ठी या महिन्याच्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर साजरी होत आहे; यानिमित्य आम्ही त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतीतो. — संपादक



श्री. गोदावरीमाता

शिरडीचा या परमपवित्र क्षेत्रापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर साकोरी नावाचे एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. भगवान श्रीसाईबाबांचे शिष्य श्रीउपासनी बाबा यांनी या सकोरीचा कन्याकुमारी आश्रम स्थापून कायापालट केला. श्रीसंत उपासनीबाबांचे निर्वाण २४ डिसेंबर १९४१ रोजी झाले व त्यानंर तेव्हापासून या आश्रमाचा साराच कारभार बाबांच्या परमशिष्य श्रीमती गोदावरीमाताजी यांच्याच हातात आहे. गेली तेहतीस वर्षे माताजी तेथला कारभार सुव्यवस्थितपणे पहात आहेत.

श्रीगोदावरीमाताजी या पूर्वाश्रमीचा हातिवलेकर कुटुंबातल्या. त्यांचा जन्म १९१४ साली विदर्भातील पुण्यशाली शेगाव क्षेत्री झाला. हे शेगाव श्री गजानन महाराजांच्या वास्तव्याबद्दल अतिप्रसिद्ध आहे. १९२४ साली. हातिवलेकर हे ब्राह्मण कुटुंब जेव्हा बाबांच्या दर्शनास आले त्यावेळी गोदावरीमाताजी या छोट्या अवघ्या दहा वर्षाच्या होत्या. ही छोटी छोकरी पहाताच बाबांनी तिची योग्यता व तिचे भावी जीवन कार्य अंतर्ज्ञानाने जाणून, लक्षात आणून तिला उचलून घेतले आणि आपल्या गळयातील हार तिच्या गळ्यात घालून तिला एक पेरू दिला व सभोतालच्या भक्तमंडळींकडे व इतर पसाऱ्याकडे बोट दाखवून ते तिला म्हणाले, "हे सर्व लोक आपलेच आहेत. हे जे सर्व आहे ते तुझेच आहे येथली व्यवस्था तू पहात जा," एका दहा वर्षाच्या अजाण दिसणाऱ्या बालिकेला उपासनी बाबा ही एवढी मोठी कामगिरी सांगत होते, हा एक मोठा चमत्कारच होय. परंतु बाबांनी अंतर्ज्ञानाने जे काही सांगितले त्यातले अक्षरन् अक्षर खरे झाले.

पुढे कु. गोदावरी हातिवलेकर आपल्या घरी जाऊन पुन्हा साकोरीला आल्या; आणि मग त्यांनी जे साकोरीला वास्तव्य केले ते कायमचेच. उपासनी बाबांनी थोड्याच अवधीत त्यांचा विवाह श्री. विष्णूपंत चांदोरकर या एका सज्जन गृहस्थांशी लावून दिला. ते नेहमी मुंबईला असत' सौ. गोदावरींची तीव्र तपश्चर्या आणि सेवाभावी वृत्ती पाहून त्यांना बाबांच्याच सेवेला अर्पण करावे असे विचार श्री. विष्णूपंतांच्या मनात येऊ लागले. त्याप्रमाणे मार्च १९२८ मधे बाबा हवा पालटण्यासाठी नाशिक-पंचवटी येथे गेले असता विष्णूपंतांनी सर्वांच्या समक्ष हातात तुलसीदल व पाणी घेऊन यथाविधी गोदावरींना बाबांच्या चरणावर अर्पण केले व त्यांना मातुश्री समजून तिथेच साष्टांग नमस्कार घातला.

पण बाबांनी गोदावरीचा असा स्वीकार केला नाही ते याबाबतीत म्हणाले, "तुम्ही गोदावरीना परमेश्वर सेवेत सोपविता आहात ही गोष्ट खरी पण असे करताना या गोष्टीचीं पूर्णता होण्यास माझ्याहीपेक्षा काय पण साऱ्या त्रिभुवनात श्रेष्ठ, बारा ज्योतिर्लिंगापैकी 'जागृत' असे श्रीत्रिंबकश्वराचे स्थान जवळच आहे. तिथे जाऊन त्याच्या पिंडीवरच गोदावरीना अर्पण करून द्या. म्हणजे साऱ्या त्रिभुवनाचा जो साक्षात् परमात्मा त्याच्या त्या झाल्या व त्याच्याच कारणात आणि अखिल जगाच्या

कल्याणासाठी त्यांचा उपयोग होईल. पुढे जसा योग असेल त्याप्रमाणे ईश्वरी मार्गात त्या लागतील. ”

श्री उपासनी बाबांच्या सांगण्याप्रमाणे श्री. विष्णूपंत त्याच दिवशी त्र्यंबकेश्वराच्या मंदिरात आपल्या गोदावरींना घेऊन गेले. बाबांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी गोदावरींना ईश्वरार्पण केले. तो दिवस शके १८४९ फाल्गुन वद्य एकादशी रविवार ता. १८ मार्च १९२८ हा होता.

पुढे शके १८५० च्या ज्येष्ठ महिन्यातील एक गोष्ट. ही गोष्ट म्हणजे गोदावरींजींच्या जीवनातील एक महत्वाची घटना म्हणून म्हणावयास हरकत नाही. १८५० च्या ज्येष्ठ शुद्ध एकादशीला गोदावरी त्र्यंबकेश्वराच्या मंदिरात दर्शनास गेल्या असता तिथे त्र्यंबकेश्वराच्या पिंडीस वाहिलेली बारीकशी रुद्राक्षांची माळ तेथल्या पुजाऱ्याने गोदावरीजींच्या हातात दिली व ती त्यांना परिधान करण्यास सांगितले. साकोरीस परतल्यावर त्यांनी ती माळ बाबांना दाखविली व सारी हकीगत कथन केली. तेव्हा बाबा म्हणाले, ” आज तुझ्यावर साक्षात् ज्योतिर्लिंग परमेश्वराचा प्रसाद होऊन तुला ही माळ मिळालेली आहे. तुझे मंगळसूत्र शंकराच्या पिंडीवर अर्पण झाले व त्याच शंकराच्या पिंडीवरची रुद्राक्षाची माळ तुझ्या गळ्यात पडली आहे. यावरून साक्षात् परमेश्वरानेच तुझा अंगीकार केलेला आहे आणि म्हणून तुझा अधिकार माझ्या पश्चात् फार मोठा होणार आहे. ” असे म्हणून त्यांनी ती माळ गोदावरीजींच्या गळ्यात घातली. नंतर एकदा स्वतः उपासनी बाबांनी आपला अधिकार गोदावरींना दिल्याचे जाहिरपणे सांगितले व त्यांना आपल्या गादीवर बसविले. तेव्हापासून बाबांची भक्तमंडळी बाबांच्या उत्तराधिकारी म्हणून गोदावरींना ‘ सती गोदावरी ’ व नंतर ‘ माताजी ’ असे म्हणू लागली.

१९४१ साली श्रीउपासनी बाबा समाधिस्थ झाल्यावर साकोरीच्या संपूर्ण कन्याकुमारी आश्रमाचे नेतृत्व श्रीगोदावरी माताजींकडे आले. वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी त्यांच्यावर ही अफाट जबाबदारी पडली. पण केवळ कर्तव्य म्हणून त्यांनी ती पत्करली. तेव्हापासून तो आजपर्यंत गेली तेहतीस वर्षे साकोरी आश्रमाच्या माताजी संचालिका आहेत.

साकोरीच्या श्री उपासनी आश्रमाचा कन्याकुमारी विभाग आणि यज्ञसंस्था अशी दोन प्रमुख अंगे आहेत. भारतात ब्रह्मवादिनी स्त्रियांचे खूपच थोडे आश्रम आहेत. त्यापैकी हा साकोरीचा आश्रम अग्रगण्य आहे. भारताच्या विविध राज्यातील प्रांतातील चाळीस कुमारिका येथे रहातात. त्या सर्व ब्रह्मचारिणी असून अध्यात्मिक ध्येयासाठी त्यांनी आपले जीवन अर्पण केलेले आहे. साकोरीत वर्षाकाठी सात यज्ञ होतात. व ते या कन्याकुमारीच करतात. कन्याकुमारी या यज्ञकार्यात अत्यंत निष्णात असून काहीतर घनपाठी आहेत. हे सारे यज्ञ समारंभ माताजींच्या

नेतृत्वाखालीच कन्याकुमारी करतात. गेल्या पंचवीस वर्षात मातार्जीनी आपल्या कन्य-कांसह भारताच्या विविध भागातून यज्ञ–याग करून यज्ञ कार्याचे लोण दूरवर पसरविले असून प्राचीन संस्कृतीची ज्योत तेवत ठेवली आहे. १९७२ साली मातार्जीनी परदेशाचा दौरा केला; तेव्हा त्यांचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. लंडन, पॅरिस, अँटवर्प इ. स्थळी कन्यांचे वेदपठणाचे कार्यक्रम झाले तेव्हा कन्यकांची वेदवाणी ऐकून तेथील श्रोते अक्षरशः भारावून गेले. विशेषतः लंडनच्या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित असलेले कँटरबरीचे आर्च बिशप यांनी तर "आम्हा लोकांना बऱ्याच दिवसानंतर शुद्ध व सुस्वर वेदमंत्र ऐकून शांति व समाधान लाभले" असे प्रशंसोद्गार काढले होते. लोककल्याणासाठी व जनतेची आध्यात्मिक जागृती करण्यासाठी मातार्जीनी आजवर भारताचा संपूर्ण प्रवास केला आहे. या त्यांच्या कार्यामुळे देशातील अनेक संतांनी, साधूंनी व धर्मप्रिय नेत्यांनी त्यांचा वेळोवेळी गौरव केला आहे.

श्री. गोदावरीमाताजींचे व्यक्तिमत्व मोठे तेजस्वी व प्रभावी आहे. यामुळेच की काय, त्यांच्या दर्शनासाठी देशातून नव्हे तर परदेशातूनही अध्यात्मिक वृत्तीची अधिकारी माणसे येतात. वेळ प्रसंगी माताजी बोलतात आणि आपल्या भक्तगणांना मार्गदर्शन करतात. स्वभावाने त्या अतिशय शांत आहेत. राग, मत्सर, असूया, ईर्षा या दुर्गुणांचा लवलेशही त्यांच्या ठायी नाही.

श्री गोदावरीमाताजींना भावी आयुष्यकाल सुखाचा जावो आणि त्यांच्या शुभवरदहस्ताचा आशीर्वाद अनेक कन्याकुमारींना लाभो हीच शुभेच्छा प्रगट करतो.

# श्रद्धा व सबुरी

● पांडुरंग भुजबळ, सातारा

श्री सद्‌गुरु साईबाबांनी आपल्या उभ्या आयुष्यात कोणालाही कोणताच मंत्र दिला नाही. श्री साईबाबांचे हयातीत त्यांचे भोवती आबालवृद्ध लोकांची गर्दी झाली, व प्रत्येकजण त्यांचेकडून कोणत्या तरी मंत्राची अपेक्षा करीत होता. पण श्रीबाबांनी कोणालाही गंडा, दोरा व मंत्र दिला नाही. त्यांनी फक्त उभ्या आयुष्यात आज जी द्वारकामाईत धुनी पेटत आहे, त्या धुनीतील उदी दिली व हजारो लोकांनी त्यांचे उदीवर श्रद्धा ठेवून त्याचे सेवन करून संकट व रोगमुक्त होऊन संसारसागरातून ते पार पडले. पण हे सर्व होण्यासाठी माणसांची कोठे ना कोठे तरी श्रद्धा असावी लागते. ज्याप्रमाणे सुबुद्ध माणसास उभ्या आयुष्यात संसाररुपी सागरातून यशस्वी पार पडण्यासाठी कोणत्यातरी सत्पुरुषावर, देवावर अगर व्यक्तीवर श्रद्धा ही ठेवावीच लागते. त्याशिवाय तो संकटपार होणार नाही. श्रद्धेबद्दल मी आपणास सांगत आहे की श्रीसाईबाबांनी सर्व भक्तांना श्रद्धा व सबुरी ठेवा तुमचा कार्यभाग साध्य होईल, याशिवाय दुसरा कोणताही मंत्र श्रीबाबांनी दिला नाही. भारतात अध्यात्म फार उच्च प्रतीचे आहे. ह्या अध्यात्माचे जोरावर माणूस कोणावर तरी श्रद्धा ठेवून संकटमुक्त होतो. भारत देश जरी गरीब असला तरी त्यातले पुष्कळ लोक अध्यात्मिक श्रद्धेवर जगत असल्यामुळे त्याना मनःशांती प्राप्त होते. सध्याचे विज्ञान युगात अमेरिका व इंग्लंड आदी देश व विज्ञानात फार प्रगत असलेल्या देशातील लोकांना मनःशांती नाही. रात्री शांत झोप येत नाही. जिवाची सारखी तळमळ चालू आहे. म्हणून ते लोकही आता भारतातील अध्यात्माचे अवलोकन करून शांती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून माणसाने श्री साईबाबांसारख्या संत पुरुषावर व त्यांचे उदीवर श्रद्धा ठेवावी. श्री बाबांचे उदीवर श्रद्धा ठेवून त्याचे सेवन करून आजपर्यंत लाखो लोक संकटमुक्त झाले आहेत. म्हणून श्रद्धा ही फार अजब चीज आहे, व ती प्रत्येक माणसाजवळ असणे व तिची खऱ्या अर्थाने जोपासना करणे अत्यंत जरूर आहे. श्रद्धेबाबत एक गोष्ट अशी की —

एका माणसाची त्याचे डॉक्टरवर फार श्रद्धा होती, व तो एकदा आजारी असताना त्याचे डॉक्टरला भेटला व त्याला आपल्या आजाराची कल्पना दिली. डॉक्टरने तब्येत तपासली व एका कागदावर औषध लिहून दिले, व रोग्यास सांगितले की हे औषध रोज सकाळ संध्याकाळ पाण्यातून घेत जा म्हणजे बरे वाटेल. पण त्या गोष्टीचा अर्थ त्या रोग्याला समजला नाही. त्याने डॉक्टरचे सांगण्यावर फार श्रद्धा ठेवली; व त्याने तोच कागद रोज सकाळ संध्याकाळ पाण्यात बुडवून काढला व ते

पाणी सात दिवस प्राशन केले. आणि काय आश्चर्य ! ह्या जबर श्रद्धेमुळे त्याचा आजार बरा झाला. ७ दिवसानी तो परत डॉक्टरकडे गेला. त्यांना म्हणाला. – तुमचे औषधांनी माझी तब्येत सुधारली. पण डॉक्टरने त्याला विचारले, कोठे आहे ती औषधाची बाटली. त्यावेळी त्या रोग्याचे डोक्यात प्रकाश पडला व आपण फक्त कागदच पाण्यात घालून रोज ते पाणी प्यालो हे त्याला पटले. तसे त्याने डॉक्टरांना सांगितले. इतकी त्याची डॉक्टरवर श्रद्धा होती, आणि म्हणूनच तो रोगमुक्त झाला ह्याला म्हणतात अजब श्रद्धा.

श्रद्धे शिवाय केलेली कोणतीही खटपट नुसता शीण आहे. दुराग्रहाने सहस्त्रावधी अश्वमेघ यज्ञ केले. त्यांनी भरलेल्या पृर्थ्वीचे दान दिले. किंवा एका आंगठ्यावर उभे राहून कठोर तपसाधना केली, ध्यान केले. जप केले. पण जर श्रद्धा नसेल तर ते खडकावर पाणी पडल्यासारखे किंवा स्वतःच्या सावलीला मिठी घालण्यासारखे होईल. हरी नामावर व सत्पुरुषावर गाढ श्रद्धा ठेवा. या कलीयुगात हरीनाम व सत्पुरुषाची वचने हा एकच मोक्षमार्ग माणसाला सहज साह्य आहे. श्रद्धेने संताचे किंवा परमेश्वराचे स्मरण केले तर प्रत्यक्ष यम देखील आपले पाश टाकू शकत नाही.

आता सबुरी बाबत लिहावयाचे म्हणजे जरी माणसांजवळ श्रद्धा असली तरी तिला सबुरीची जोड आवश्यक आहे. नुसती श्रद्धा ठेवली व लगेच गुण येण्याची गडबड करू लागला तर ते कधीही शक्य नाही. म्हणून सबुरीही प्रत्येक कामास आवश्यक आहे. सबुरी म्हणजे धीर पहाणे, धरणे. आणि धीर म्हणजे योग्य समयाची वाट पहाणे. आपण जर सबुरी ठेवली तर श्रद्धा आपल्या मागे धावत येऊन आपला कार्यभाग यशस्वी केल्याशिवाय रहाणार नाही. ज्याप्रमाणे तूप खाल्ले की लगेच रुप येत नाही. औषध घेतले की लगेच गुण येत नाही. त्याला काही मर्यादेपर्यंत वाट पहावी लागेलच. म्हणून माणसाने सबुरी जरूर ठेवावी. श्री साईबाबांनी कित्येक उतावीळ हलक्या दिलाचे लोकांना श्रद्धा व सबूरी हाच मंत्र देऊन संकटपार केले आहे. तेव्हा कोणत्याही कामात श्रद्धा तर पाहिजेच व त्याच बरोबर सबुरीचीही कास धरावयास पाहिजे. त्या शिवाय तरणोपाय नाही.

**श्री साईनाथ रोजनिशी – १९७५–७६**

भव्य स्वरूपात आणि आकर्षक छपाईत गुढीपाडव्यास प्रसिद्ध होणार.

बाबांचे मोहक बहुरंगी संग्राहक छायाचित्र.

# शिर्डीच्या श्रीसाईबाबांचा संदेश

• श्रीराम व्ही. सातर्डेकर

आधुनिक काळात होऊन गेलेल्या सत्पुरुषांत श्रीसाईबाबांनी जनमनाची जशी पकड घेतली तशी इतर कोणी घेतली नाही याचे मुख्य कारण कोणते बरे असावे नाना प्रकारच्या दुःखतापानी पिडलेली माणसे, बाबांचे शिरडीत वास्तव्य असलेल्या काळात त्यांच्या दर्शनास जात असत व आपण दुःखमुक्त झाल्याचा अनुभव त्यांना येत असे. ते समाधिस्थ झाल्यानंतरही समाधि दर्शनास लोक जाऊ लागले व ही दर्शनोत्सुक भक्तांची संख्या उत्तरोत्तर अव्याहत वाढत चालल्याचे दृश्य आपण आज पाहत आहोत. जी शक्ति पूर्वी कोणत्या ना कोणत्या दुःखतापाने पिडलेल्याचे दुःख विमोचन करीत असे, त्या शक्तिचे, ते भूतदयेचे कार्य आजच्या काळातही चालू आहे. दूरदूरच्या प्रांतातून, पाश्चात्य लंडन अमेरिका, आफ्रिका देशातून प्रवासाचे नाना प्रकारचे त्रास सहन करून व जवळ असलेले नसलेले पैसे खर्च करून लोक शिरडीस जातात. ते काय! त्यांना प्रवासाचे त्रास भोगण्याची किंवा पैसे खर्च करून बसण्याची हौस आहे म्हणून?

शिरडी हे असंख्य लोकांचे काल काय आणि आज काय, यापुढेही कल्पातांपर्यंत अमर्याद आशेचे व समाधानाचे स्थान होऊन राहाणार आहे. आपले कुठे तरी नडते आहे, कुठे तरी खटकते आहे, काहीना काही स्वरूपाचे दुःख जीवाला त्रास देत आहे. चला आपण शिरडीला जावू असे मनात येण्याची खोटी. पैसे नसले तरी ते कुणाकडून तरी उसने घेऊनही पाय शिरडीची वाट चालू लागतात, आणि शिरडीत पोहोचलेले पाय पदरात निराशा बांधून न येता आशेचा अंकुर बरोबर घेऊन येतात. हा माझा आज ३० वर्षाचा स्वानुभव आहे. अशी शिरडीची श्रीसाईबाबांची थोर पुण्याई आहे, व या पुण्य पुरुषाच्या वात्सल्याने पुनीत झालेली व अनंत पुण्यकार्ये घडलेली ती पुण्यभूमी आहे.

श्री साईबाबा शिरडीत आले ते मानवतेच्या कल्याणासाठी. समाधिस्थ होण्याच्या स्थितीपर्यंत त्यांनी अखंड मानवसेवा केली. समाधिस्थ झाल्यानंतर आजही त्यांचे तेच कार्य अव्याहत सुरू आहे. प्राणिमात्राची दुःखे पाहून संतांची अंतःकरणे द्रवतात. दुसऱ्याचे दुःख मग ते कोणत्याही प्रकारचे असो, त्यांच्याने पाहवत नाही. कोणी कोणत्याही प्रकारच्या दुःखाने पोळलेला, गांजलेला असो. संतांना त्याची करुणा येते. आपले दैवी सामर्थ्य खर्च करून दुःखी माणसाला सुखी करण्यासाठी ते झटतात. 'भूतदया हेचि भांडवल संता' असे म्हटले आहे ते अक्षरशः खरे आहे.

साईबाबांपाशी नाना प्रकारची दुःखे घेऊन असंख्य लोक येत असत. कोणाची

दुःखे केवळ सुईच्या अग्राएवढी लहान तर कोणाची हिमालयाएवढी प्रचंड ! परंतु लहान असोत वा मोठी असोत, ती सारी दुःखेच !

बाबांपाशी येणारा माणूस दुःखमुक्त होऊन परत जात असे. तो माणूस दुष्ट आहे की, सुष्ट आहे हे बाबा पाहत नसत. ज्याच्या कर्माचा जो तो. जे दुःख घेऊन तो आला असेल, ज्या दुःखाची जाचणी त्याला जाणवत असेल ते त्याचे दुःख दूर करायचे हा त्यांचा उपक्रम सतत चालू असे.

आपणाकडे येणारा माणूस पापी आहे की पुण्यवान आहे, सच्छिल आहे की, नीतीभ्रष्ट आहे, हिंदु आहे का ख्रिश्चन आहे, श्रीमंत आहे की गरीब आहे, हा भेदभावाचा विचार त्यांच्या मनाला कधीकाळीं शिवला नाही. तो माणूस आहे आणि काहीतरी दुःखाने व चिंतेने पिडलेला आहे एवढेच त्यांनी पहावे. नाना प्रकारच्या दुःखतापानी पोळलेली माणसे आपण आपल्या समोवार हरघडी पाहतो. परंतु " परदुःख शीतल.

या भावनेने, त्यांचे दुःख हलके करण्यासाठी झटण्यापेक्षा त्यांच्याकडे पाठ फिरविण्याची आपली प्रवृत्ती असते, माझी काळजी कशी दूर होईल. माझे दैन्य कसे नाहीसे होईल व मी अधिक सुखी कसा होईन ! याची रात्रंदिन आम्हाला विवंचना लागून राहिलेली असते अशा या स्वार्थी जगात साईबाबांनी परमार्थाचा, व इतरेजनांस सुखी करण्याचा संसार थाटला. जे जे त्यांच्याकडे आले, ते ते दुःखमुक्त होऊन गेले. आजही तोच उपक्रम चालू आहे. " शिरडीस ज्याचे लागतील पाय, टळती अपाय सर्व त्याचे ! "

संतांचे कार्य हे असेच असते. शिरडीचे संत त्याला अपवाद नव्हते. परंतु त्यांच्या चरणाजवळ येणाऱ्यांनी यापासून जे शिकायचे, ते जर ते शिकले नाहीत तर तो दोष कोणाचा !

श्रीसाईबाबांची शिकवण ही माणुसकीची शिकवण आहे. माणसांनी परस्परांशी माणुसकीने, दयाभावाने व सेवाभावाने वागावे. स्वार्थापलीकडे आपली मजल नेऊन स्वतः पलीकडे जग पहावयाला शिकावे यासाठीच संताचा अवतार असतो. त्यासाठीच ते आमच्यात येतात, आमच्या सुखासाठी व आनंदासाठी झटतात. या वागणुकीचा इष्ट तोच परिणाम आमच्यावर नको का घडून यायला ! परंतु असे सदासर्वकाळ सर्व बाबतीत घडतेच असे मात्र नाही. नाना प्रकृतिची व नाना प्रवृत्तीची माणसे आपल्या समोवार वावरत असतात. कोणावर इष्ट तो परिणाम तात्काळ घडतो. परंतु परिणाम घडण्याची क्रिया अखंड चालू असते.

आजच्या काळात साईबाबांच्या माणुसकीच्या शिकवणुकीची आम्हाला आत्यंतिक जरूरी आहे. आज आपण आपल्या समोवार काय पाहत आहोत !

मानव समाजाची नैतिक पातळी खालावलेली आहे. जो तो स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्यासाठी झटत आहे. दुसऱ्याचे काय होईल याची तिळमात्रही फिकीर करावयाची नाही. श्रीमंत आहेत ते आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन इतरेजनापुढे करून त्यांना कसे दिपवून टाकता येईल, या उद्योगात गर्क आहेत. तर गोरगरीब आजची दुपार गेली आता उद्यांची कशी जाईल, या विवंचनेत आहेत. दुसऱ्यांच्या सुखासाठी व समाधानासाठी झटण्यापेक्षा दुसऱ्यांचे स्वतःच्या स्वार्थासाठी रक्तशोषण कसे करता येईल याच फिकीरीत सर्वसमर्थ किंवा अर्धसमर्थ लोक आहेत !

याला का माणुसकी म्हणायची ! आम्हीं बाबांच्या चरणांपाशी गेलो किंवा जाऊ इच्छितो ते काय याचसाठी ! माणुसकीची ममता आमच्या ठायी निर्माण झाली नाही, स्वतःचे सुख संभाळूनही इतरेजनांच्या सुखाची यथाशक्ति दखल घेण्याची प्रेरणा आम्हांला झाली नाही तर बाबांचे स्मरण आम्हीं कां म्हणून करावे ! शिर्डीस येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या ठायी बाबांच्या या माणुसकीच्या शिकवणीचा आविष्कार अंशतः कणाकणांने तरी व्हायला पाहिजे.

## नामस्मरणरूपी शेताची मशागत

(पान ४ वरून)

**कर्तव्यकर्म म्हणून वेळ झाली की, आपल्या शेताची मशागत करणारा आहे, तर दुसरा आळशी म्हणजे मशागत न करणारा आहे. आता पाऊस जेव्हा पडेल तेव्हा ज्याने मशागत केली त्याचे शेत उत्तम वाढेल पण दुसऱ्याचे वाढणार नाही. म्हणजे भगवंताच्या कृपेने जो पाऊस पडणार त्याचा एकाला फायदा मिळेल तर दुसऱ्याला मिळणार नाही. जो नियम प्रपंचात लागू तोच नियम परमार्थात लागू. भगवंताची कृपा सर्वांवर सारखीच असते : ज्याने ज्या प्रमाणात चित्तशुद्धी केली असेल त्या प्रमाणात त्याला फायदा मिळेल. दुसऱ्याला मिळणार नाही. भगवत् किंवा संत समदृष्टी असतात ते असे. त्यांच्या ठिकाणी जर विषमता दिसली तर तिचा उगम किंवा कारण आपल्यातच आहे हेच यावरून दिसते.**

**संग्राहक — बाळकृष्ण सदाशिव धामणकर**

लेखांक ४

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

( लेखक : होरालंकार शं. वा. देवधर दादर, मुंबई )

## राहूची शुभाशुभ फले

राहूकेतु हे ग्रह नसून ते छेदनबिंदु आहेत. परंतु त्यांची फले इतर ग्रहांसारखीच परिणामकारक होतात.

( १ ) जन्मराशीच्या प्रथमस्थानी राहू आला असता मनात ईश्वरविषयक भावना उत्पन्न होतात. आरोग्य चांगले रहात नाही. मनस्थितीमध्ये अस्थिरता उत्पन्न होते.

( २ ) जन्मराशीपासून द्वितीयस्थानी राहू आला असता सांपत्तिक घडामोडी घडतात. स्थावर इस्टेटीचे बाबतीत ह्या घडामोडी विशेषतः असतात.

( ३ ) जन्मराशीपासून तृतीयस्थानी राहू आला असता अत्यंत महत्वाची फले देतो. विद्याभ्यासात प्रगती व यश मिळते. नातेवाईकाकडून फायदा होतो. नोकरीत अधिकाराची वृद्धी होते.

( ४ ) जन्मराशीपासून चतुर्थस्थानी राहू आला असता स्थावर इस्टेटीबद्दल घडामोडी घडतात. अनपेक्षित रीतीने त्यांत फायदा होतो.

( ५ ) जन्मराशीपासून पंचम स्थानी राहू आला असता विद्यार्थीदशेमध्ये, विद्येत यश येईल. परंतु संततीमध्ये पीडा निर्माण होईल. गर्भवती स्त्रियांना गर्भपाताची भीति राहील. पण खेळाडूंना यश व कीर्ती मिळेल.

( ६ ) जन्मराशीपासून षष्ठस्थानी राहू आला असता तो अत्यंत प्रबळ असतो.। नोकरीतील स्थिती निश्चित सुधारते. शत्रूवर विजय प्राप्त होतो. डॉक्टर, नर्स वगैरेंना लाभदायक होतो. यश, कीर्ति व पराक्रम यांचा हा राहू द्योतक आहे.

( ७ ) जन्मराशीपासून सप्तम् स्थानी राहू आला असता भागीदारी व कोर्ट या कामात दगदग होते, पण यश मिळते. शत्रू निर्माण होतात. भागीदारीमध्ये यश देणारा हा राहू आहे.

( ८ ) जन्मराशीपासून अष्टम् स्थानी राहू आला असता आरोग्याला विघातक असतो. विलंबी आजार होतात. व्यापारधंद्यात अडचणी निर्माण होतात.

( ९ ) जन्मराशीपासून नवम् स्थानी राहू आला असता तीर्थयात्रा, प्रवास व परदेशगमनही होऊ शकते. आर्थिक [illegible]थ सुधारते.

( १० ) जन्मराशीपासून दशम् स्थानी राहू आला असता नोकरीत बढती मिळते. मानसन्मान वाढतो. व्यापाऱ्यांना हा काळ हितकारक आहे. दशमातील राहू निश्चित भाग्यदायक आहे.

( ११ ) जन्मराशीपासून एकादश स्थानी राहू आला असता मित्र व ओळखीच्या लोकांकडून फायदे होतात. काही अपेक्षा पूर्ण होतात. साधारण मध्यम वयाच्या लोकांना मुलांपासून फायदे होतात.

( १२ ) जन्मराशीपासून द्वादश स्थानी राहू आला असता अनेक तऱ्हेने आपत्ती आणतो. गुप्त शत्रूत्व त्रासदायक होते. पण गुप्त कार्यात यश येते.

राहूची पीडा नष्ट करण्यासाठी 'गोमेद' ( Agate ) हे रत्न वापरावे.

## चंद्राची शुभशुभ फले

चंद्र हा बारा राशीतून साडेसत्तावीस दिवसात भ्रमण करतो. म्हणजेच प्रत्येक महिन्यात तो सर्व राशीतून फिरतो. त्यामुळे व्यवहारातील कामे कोणत्या वेळी केल्यास यश मिळेल ? आजार, कमी जास्त केव्हा होईल ? हे चालू चंद्रावरून कळते.

( १ ) जन्मराशीपासून प्रथम स्थानी चंद्र आला असता प्रकृतिस्वास्थ्य राहील. प्रवासाची आवड उत्पन्न होईल. सार्वजनिक कामामध्ये यश मिळेल. ही कामे यावेळी करावी.

( २ ) जन्मराशीपासून द्वितीय स्थानी चंद्र आला असता पैशासंबंधी व्यवहार, खरेदी, विक्री, गृहसौख्य ह्या दृष्टीने लाभदायक ठरतो. वक्तृत्वालाही यशदायक असतो.

( ३ ) जन्मराशीपासून तृतीय स्थानी चंद्र आला असता पत्रव्यवहार, लहान-सहान प्रवास करण्यास योग्य असतो.

( ४ ) जन्मराशीपासून चतुर्थ स्थानी चंद्र आला असता कुटुंबसौख्य व गृहसौख्यासाठी चांगला असतो. जमीन व घराचे व्यवहार करणे, बिऱ्हाड बदलणे वगैरे बाबतीत अनुकूल असतो.

( ५ ) जन्मराशीपासून पंचम्स्थानी चंद्र आला असता सट्टा, लॉटरी, मटका, रेस, जुगार, ब्रिज वगैरे खेळात पैसा मिळण्यास अनुकूल असतो. अशावेळी परिक्षेचे निकाल अनुकूल लागतात. खेळाचे बाबतीत यश. नाटक, सिनेमा, गायन यात आनंद देणारा असतो.

( ६ ) जन्मराशीपासून षष्ठम्स्थानी चंद्र आला असता दोन तीन दिवस तरी आजार येतो. पचनक्रिया बिघडते. पण उद्योगधंद्याविषयी फायदेशीर गोष्टी होतात.

( ७ ) जन्मराशीपासून सप्तम्स्थानी चंद्र आला असता विवाह व सोयरीक जुळविण्यास हा चंद्र आवश्यक आहे. उद्योगधंद्यातील मतभेद मिटविण्यास हा उत्तम योग आहे.

(८) जन्मराशीपासून अष्टम्स्थानी चंद्र आला असता आजाराची वाढ करतो. दुखण्याचा जोर अकस्मात वाढतो. लाचलुचपत घेण्यास हा चंद्र फायदेशीर आहे. मृत माणसाच्या पैशासंबंधी व वारसा संबंधी व्यवहार करण्यास उत्तम.

(९) जन्मराशीपासून नवम्स्थानी चंद्र आला असता विद्यार्थ्यांचे परीक्षेचे निकाल अनुकूल लागतात. तीर्थयात्रा सुखकारक होतात. धर्मश्रद्धा व आध्यात्मिक ज्ञान ह्यांना हा चंद्र उत्तम.

(१०) जन्मराशीपासून दशम्स्थानी चंद्र आला असता उद्योगधंद्यात फायदे होतील. वरिष्ठांची मर्जी संपादन होईल. उद्योग व नोकरीत यश येईल.

(११) जन्मराशीपासून एकादशस्थानी चंद्र आला असता सामाजिक कार्यास यशकारक असतो. मित्र व ओळखीच्या लोकांपासून फायदा होतो. अनपेक्षित लाभ होतात.

(१२) जन्मराशीपासून द्वादश स्थानी चंद्र आला असता मंत्र तंत्र, गुप्त कार्ये, गूढ विद्या वगैरे बाबतीत हितकारक असतो. बाकी तो नुकसानकारक असतो.

कोणताही मुहूर्त चंद्रबल अनुकूल असल्याशिवाय योग्य ठरत नाही. म्हणून वरील माहिती चंद्राची अनुकूलता पहाण्यास फार उपयुक्त ठरेल.

चंद्र प्रतिकूल झाला असता 'मोती' (pearl) हे रत्न वापरावे.

## केतुची शुभाशुभ फले

(१) जन्मराशीपासून प्रथम स्थानी केतु आला असता सांपत्तिक नुकसान व प्रकृतिला आजार उत्पन्न होतात.

(३) जन्मराशीपासून द्वितीय स्थानी केतु आला असता कर्ज काढण्याचे प्रसंग येतात. शेती व उद्योगधंद्यात नुकसानी होते. कुटुंबात दुःखद प्रसंग येतात.

(३) जन्मराशीपासून तृतीयस्थानी केतु आला असता मानसिक पीडा व आप्तेष्टात कलह उत्पन्न होतात.

(४) जन्मराशीपासून चतुर्थ स्थानी केतु आला असता जमीन, इमारती यांमध्ये तंटे उत्पन्न होतात.

(५) जन्मराशीपासून पंचम्स्थानी केतु आला असता संततीला अशुभ फले देतो. व्यसनी लोकांचे भयंकर नुकसान होते.

(६) जन्मराशीपासून षष्ठम स्थानी केतु आला असता तो पराक्रम व यश देणारा आहे. मातुल पक्षाकडून फायदा होतो.

(७) जन्मराशीपासून सप्तम् स्थानी केतु आला असता व्यवहारिक सुखाला घातक ठरतो. रवि-शनि-मंगळाशी युती होईल तर कुटुंबसौख्य नष्ट होईल.

( ८ ) जन्मराशीपासून अष्टमस्थानी केतु आला असता फसवेगिरी व लबाडीपासून नुकसान होते. असाध्यविकार जडण्याचा काळ असतो.

( ९ ) जन्मराशीपासून नवम् स्थानी केतु आला असता कीर्तिला धक्का देणारा असतो. प्रवासामध्ये व तीर्थयात्रेत वाईट प्रसंग येतात.

(१०) जन्मराशीपासून दशम स्थानी केतु आला असता नोकरीधंद्यामधे विश्वासघात, सार्वजनिक कार्यात अपयश येते.

(११) जन्मराशीपासून एकादश स्थानी केतु आला असता आशा निर्माण करतो. मित्र वाढवतो.

(१२) जन्मराशीपासून द्वादशस्थानी केतु आला असता गुप्त शत्रुत्व, वाईट आरोग्य व व्यवहारात नुकसान होते.

केतुचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी ' लसण्या ' ( cat's eye ) हे रत्न वापरावे.

## शुक्राची शुभाशुभ फले

शुक्र हा संपत्तीदायक शुभग्रह आहे. तो अनुकूल झाला असता सांपत्तिक लाभ, चैनीच्या वस्तु यांची प्राप्ती होते.

( १ ) जन्मराशीपासून शुक्र प्रथमस्थानी आला असता मनुष्य आनंदी व उत्साही रहातो. त्याला ऐषआराम व चैन करावीशी वाटते.

( २ ) जन्मराशीपासून शुक्र द्वितीयस्थानी आला असता सांपत्तिक लाभाला चांगला. सांपत्तिक लाभाच्या दृष्टीने फायदेशीर होतो.

( ३ ) जन्मराशीपासून तृतीयस्थानी आला असता छोटे प्रवास, काव्यस्फूर्ती व लेखनाची स्फूर्ती देणारा आहे.

( ४ ) जन्मराशीपासून शुक्र चतुर्थस्थानी आला असता उत्तम मानसिक स्थिती प्राप्त करून देतो.

( ५ ) जन्मराशीपासून शुक्र पंचमस्थानी आला असता कलावंत गायक, वादक वगैरेना स्फूर्तीदायक, पत्ते, रेस, जुगार यांना चेतना देणारा असतो.

( ६ ) जन्मराशीपासून शुक्र षष्ठमस्थानी आला असता मनुष्य व्यसनात अधिकाधिक गुरफटतो. चैनीच्या खाण्यामुळे रोग उद्भवतात.

( ७ ) जन्मराशीपासून शुक्र सप्तमस्थानी आला असता वैवाहिक जीवन व प्रेमविवाह यांना योग्य असतो.

( ८ ) जन्मराशीपासून शुक्र अष्टमस्थानी आला असता गुप्त धन, रेस व सट्टा यात लाभ. स्त्रियांना मासिक पाळीचा त्रास होतो.

( ९ ) जन्मराशीपासून शुक्र नवमस्थानी आला असता कलेला पोषक व उच्च शिक्षणाकरिता लाभदायक आहे. प्रवासाला उत्तम.

(१०) जन्मराशीपासून शुक्र दशमूस्थानी आला असता नोकरीत मान्यता मिळते. चैनीच्या व मौल्यवान वस्तूंच्या धंद्यात फायदा होतो.

(११) जन्मराशीपासून एकादश स्थानी शुक्र आला असता मित्र–परिवार वा नातेवाईक यांच्या भेटी होतात. कलावंत मित्र–मंडळी भेटतात.

(१२) जन्मराशीपासून द्वादश स्थानी शुक्र आला असता चैनीच्या कार्यात अवास्तव खर्च होतो.

शुक्राचे योग विशेष परिणामकारक नाहीत. शुक्र अनिष्ट आला असता हिरा (Diamond) हे रत्न वापरावे.

## हर्षलची शुभाशुभ फले

हर्षल हा प्रत्येक राशीत सात वर्षे असतो. आयुष्यावर आकस्मिक परिणाम करणे हा हर्षलचा गुणधर्म आहे.

(१) जन्मराशीपासून प्रथम स्थानी हर्षल आला असता मनुष्याच्या परिस्थितीत अकस्मात बदल होतो. स्थानामध्ये, नोकरीमध्ये व इतर परिस्थितीमध्ये अचानक बदल घडवून आणणे हे हर्षलचे कार्य आहे. डोकेदुखी, अर्धशिशी वगैरे विकार हर्षलमुळे उत्पन्न होतात.

(२) जन्मराशीपासून द्वितीय स्थानी हर्षल आला असता सांपत्तिक स्थितीत अचानक बदल होतो. एखाद्यावेळी अचानक फायदा किंवा नुकसान घडवून आणतो.

(३) जन्मराशीपासून तृतीय स्थानी हर्षल आला असता अचानक प्रवास घडतो. कल्पनाशक्ती वाढते. बंधु आणि भगिनींना कोणालातरी घातक असतो. लेखकांना नवीन कल्पना सुचतात.

(४) जन्मराशीपासून चतुर्थ स्थानी हर्षल आला असता घर, आईवडील, यांना अशुभ फलदायक ठरेल. इस्टेटी संबंधी भानगडी उत्पन्न होतील.

(५) जन्मराशीपासून पंचम् स्थानी हर्षल आला असता विवाहामध्ये ऐनवेळी अडचणी येतात. विवाह मोडतात किंवा ऐनवेळी आकस्मिक गोष्टी घडून विवाहात विघ्न निर्माण होते.

(६) जन्मराशीपासून षष्ठम् स्थानी हर्षल आला असता नोकरी, धंदा यांमध्ये अडचणी निर्माण होतात पण शेवट चांगला होतो. शरीर प्रकृति नीट रहात नाही.

(७) जन्मराशीपासून सप्तम् स्थानी हर्षल आला असता कुटुंबसौख्यात बिघाड होतो. गृहसौख्याचे बाबतीत अशुभ. भागीदारी धंद्यात भागीदारी मोडण्याचा संभव असतो.

(८) जन्मराशीपासून अष्टम् स्थानी हर्षल आला असता आध्यात्मिक ज्ञानाकरिता व वेदान्ताच्या अभ्यासाकरिता उत्तम असतो. नातेवाईकांशी तंटे निर्माण होतात.

( ९ ) जन्मराशीपासून नवम्‌स्थानी हर्षल आला असता दीर्घ प्रवास घडतात. नवीन संशोधनाच्या कामी व अभ्यासाला स्फूर्ती येते.

( १० ) जन्मराशीपासून दशम्‌ स्थानी हर्षल आला असता फार महत्वाचा असतो. नोकरीमधे अचानक बदल. उद्योगधंद्यामधे चढउतार व निवडणुकीमध्ये यश देणारा आहे.

( ११ ) जन्मराशीपासून एकादश स्थानी हर्षल आला असता मित्रांमुळे आयुष्यातील विलक्षण घटना घडतील. विश्वासघात होण्याचाही संभव आहे.

( १२ ) जन्मराशीपासून द्वादश स्थानी हर्षल आला असता कोणावरही विश्वास ठेवू नये. बाराव्या स्थानामधे हर्षल विशेष महत्वाचा नाही.

हर्षल अशुभ असेल तर " अलेक्झांड्रा " हे रत्न वापरावे.

### नेपच्यूनची शुभाशुभ फले

नेपच्यून प्रत्येक राशीत अंदाजे १४–१५ वर्षे असतो. त्यामुळे त्याची फळे विशेष परिणामकारक होत नाहीत. याचा परिणाम मनोविकार व वासना यावर होतो. म्हणून नेपच्यूनच्या फलाविषयी जास्त विस्ताराने लिहिले नाही.

## साईबाबांचा महिमा

आज अचानक स्वप्नी आले मूर्त साईबाबा
अन्‌ दुःखाने ग्रासल्या मनी सापडला धागा ...... ध्रु
नैराश्याचे मेघ वितळले अन्‌ हर्षाचे गगन निवळले
भक्ताची या लाज राखण्या साईबाबा क्षणी धावले
ब्रह्मानंदी तल्लीन होण्या सूर भक्तीचा होई जागा ......१
प्रसन्न मुद्रा, तेज आगळे ईश्वरी अवतार
संकटकाळी तुम्ही दाविले मुक्तीचे द्वार
नाम मुखी घेताच नष्टती संसारिक बाधा ......२
महिमा आहे अपार तुमचा वर्णू तो मी किती
भक्तीचे हे आलय, सारे गुण मनी फुलती
भक्ताचा कनवाळू आहे शिरडीचा राजा
आज अचानक स्वप्नी आले मूर्त साईबाबा
अन्‌ दुःखाने ग्रासल्या मनी सापडला धागा

— प्रकाश सहस्रबुद्धे

# श्री साईनाथ

## ( श्रीसद्गुरु साईमहाराज ललितचरित्र )

**• र. श्री. पुजारी**

**(३५) अंतरात्मा संतुष्ट करून शाश्वतचे वैभव देणारे एक सद्गुरूच !**

पोथी संपताच अण्णासाहेब दाभोळकर दीक्षित वाड्यातून बाहेर पडले. दाराशी भेटलेल्या दीक्षितांच्या नोकराला म्हणाले, " हे पाहा, भाऊसाहेबांना सांग की म्हणावे मी पाय मोकळे करायला थोडा बाहेर गेलो आहे. परत आल्यानंतर मशिदीकडे बाबांच्या दर्शनासाठी जाऊ. "

अण्णासाहेब दाभोळकर पश्चिमेकडील वाटेने सरळ निघाले. समोरच घनदाट जंगल उभे होते. त्याच्या आतील बाजूने गुप्तपणे एक ओढा वहात होता. त्याची खळखळ उन्हाळ्यामुळे आता थांबली होती. तरी त्या वनात शुकशुकाट नव्हता. उलट वसंतऋतूच्या आगमनामुळे आनंदित होऊन पक्षिगणाचे कूजन मोठ्या मनमुरादपणे सुरू होते. क्षणाक्षणाला नवनवीन स्वरांची आलापी कानावर येत होती.

त्या घनदाट वनाच्या दर्शनाने अण्णासाहेबांचे मन प्रसन्न झाले. मनात विचार आला : या पुण्यभू भरतखंडातील ऋषिमुनींनी आत्मचिंतनासाठी निबिड अशा वनस्थलांचा आश्रय केला. आपले उभे आयुष्य जनसंमर्दापासून दूर राहून निःसंगपणे व्यतीत केले. दिवसातून दोन वेळा बाबा या वनाचा आश्रय करतात. यातील हेतू गूढ असला पाहिजे. बहिर्दिशेच्या निमित्ताने येथे येऊन कदाचित बाबा या स्थानी पुरश्चरण करीत असावेत.

श्रीसमर्थ रामदास स्वामी—पुरश्चरणासाठी डोंगरदऱ्यातील गूढ स्थानांच्या घळीचा आश्रय करीत. श्रीतुकाराममहाराज भंडाऱ्याच्या डोंगरावरील एकांतात जाऊन बसत. बाबांचे लेंडी ओढ्यावर जाणे या प्रकारचे असले पाहिजे. त्याविना त्यांच्या दिनक्रमातील ही गोष्ट त्यांनी इतक्या काटेकोरपणे पाळली नसती.

दत्तगुरू श्रीस्वामी नृसिंहसरस्वती गाणगापुरी असताना असेच सकाळ संध्याकाळ भीमा—अमरजा संगमावर जात. सकाळचे अनुष्ठान उरकून माध्यान्ह समयी गाणगापूर गावात भिक्षेसाठी परत येत. भक्तांशी किंवा शिष्यांशी जे काही संभाषण घडे ते या दोन वेळा व्यतिरिक्त असलेल्या इतर वेळी. अनुष्ठान संपल्यानंतर.

यवनवेष धारण केल्यामुळे जनरीतीस अनुसरून बाबांनी आपला दैनंदिन कार्यक्रम थोडा बदलला असावा, आपणही एक फकीर आहो हे दर्शविण्यासाठी ही मुक्ती असावी.

पहाटे उठून धुनीसमोर बसणे; भागोजीकडून सेवा घेणे; मग हातावर पायावर, तोंडावर, कानावर यथेच्छ पाणी घेऊन नाजुकपणे तो भाग चांगला स्वच्छ करणे; तोंड धुणे झाल्यावर गावात भिक्षेस जाणे; नेमक्या पाच ठिकाणी जाऊन एके ठिकाणी उभे रहाणे; भाकरी, कोरड्यास जे काय येईल ते घेणे; मशिदीत आल्यावर थोडेसे खाणे; खाणे झाल्यावर भक्तांची बैठक होऊन गोष्टीरूपाने, हसतखेळत त्यांना बोध करणे; तो करीत असताना भक्तांना केळी, पेरू, आंबे इत्यादी फळे वगैरे खाऊ घालणे, त्यानंतर लेंडीवर जाणे; तेथून परत मशिदीत आल्यानंतर भक्तांकडून पूजा–आरती वगैरे स्वीकारणे, बोध करणे; मग जेवण करून पुन्हा लेंडीवर जाणे; तेथून परत येऊन पुन्हा मशिदीत बसणे; भक्तांशी पुन्हा हितगोष्टी करणे; त्यांची भूमिका शुद्ध करून प्रगतीची पायरी पाहून बीजारोपण करणे; पेरलेले कितपत उगवले हे पाहाणे.

पण हे करीत असताना वेद, उपनिषदे, शास्त्रेपुराणे यांचा वासही कोणास येणार नाही. जणू बाबा ही एक निरक्षर व्यक्ती ! ती व्यक्ती स्वानुभवाने, ईश्वरीकृपेने जे जे बोलते ते सर्व सत्यच येते असे कोणासही वाटावे ! बाबांच्या बोलण्यातील खोचकपणा, उपरोध, नर्मविनोद, सर्वांच्या परिचयाचे दृष्टांत यामुळेच कोणीही मोहून जावे ! जणू मशिदीत बसून भक्तांच्या मनावर मोहक असे इंद्रजालच बाबा पसरत आहेत ! सर्वांच्या मनावर एक प्रकारचे गारुडच करीत आहेत !

अण्णासाहेब दाभोळकरांना मुंबईतील काही विद्वानांचे उद्गार या वेळी आठवले. ते विद्वान कुत्सितपणे म्हणाले होते, "चमत्कार करणे ही अध्यात्मज्ञानातील सर्वांत खालची पायरी. हातातून कुंकू–बुक्का–अबीर काढण्यासाठी तर काहीच योग्यता लागत नाही. कोंबडे–नारळ करून हीन देवताना प्रसन्न करून घेणे काहीच अवघड नसते. चमत्कार मनकवडेपणा यांच्या मोहजाळात दुसऱ्याना अडकविणारा मनुष्य संत मुळीच नसतो. स्वतःचे देव्हारे मिरविणारा, त्या कामी भोळ्या, अगतिक विद्वानांचे साहाय्य घेणारा तो असतो एक पोटभरू ! फार तर जादूटोणा करणारा, बायाबापड्यांना नादी लावणारा एक भोंदू, लबाड, गुरू ! असे गुरू अडक्याचे तीन मिळाले तरी ते त्यजावे' असे समर्थांनी मोठ्या पोटतिडीकीने लिहून ठेवले आहे."

अण्णासाहेब विचार करू लागले : दुसऱ्यांना क्षणभर दिपवून टाकणे हाच चमत्कारांचा गुणधर्म. जादूगाराने चमत्कार करून रुपये किंवा जिलब्या यांचा ढीग प्रेक्षकांच्या समोर घातला तरी जोपर्यंत प्रेक्षकांच्या आणि स्वतः त्याच्याही दारिद्र्याचे निर्मूलन किंवा भुकेचे शमन तो ढीग करू शकत नाही, तोपर्यंत तो सर्व प्रकार निराशाजनकच !

बाबा हे जादुगार असतीलही. पण त्यांच्या जादूत भुकेचे शमन करण्याचे सामर्थ्य आहे. सर्व तऱ्हेच्या दारिद्र्याचा नाश करण्याचे तेज आहे. सर्वांचा अंतरात्मा संतुष्ट करून शाश्वतचे वैभव त्यांच्या हवाली करण्याचे बळ बाबांमध्ये आहे, म्हणूनच माझ्यासारखा गुरुपद न मानणारा नास्तिकही त्यांच्या चरणी येऊन लीन झाला !

ही लीनता आत्म्याचे उद्धरण करणारे समर्थ गुरू—श्रीसद्गुरू एक बाबाच होते हे मला पूर्णपणे मनोमन पटल्यामुळे ! एका दिवसात नव्हे, तर महिनेच्या महिने साशंकपणे बाबांकडे पाहिल्यानंतर मगच पटल्यामुळे !

अण्णासाहेब भूतकाळातील घटना पुन्हा तपासून पाहू लागले. त्या त्या घटनांबाबतची आपली प्रतिक्रिया काय होती हे पुन्हा आठवून पाहू लागले. स्वतःशी म्हणाले, " सॉलिसिटर काकासाहेब दीक्षित यांचा आणि माझा दृढ स्नेह. वांद्यास मी मॅजिस्ट्रेट असताना तो प्रथम जडला. श्रीमत भगवत्गीतेमधील कूटस्थानांची चर्चा हा आमच्या स्नेहाचा मूळ धागा. परंतु हळूहळू दोघेही अध्यात्मशास्त्राबद्दल बोलू लागलो. तिऱ्हाईताची भूमिका सोडून आत्मोद्धाराच्या भूमिकेवर आलो. थोर संतमहात्मे यांची जीवने मार्गदर्शक, म्हणून त्यांच्याकडे पाहू लागलो. पण एक गोष्ट मला वादविवाद करूनही पटली नाही. ती म्हणजे आत्मोद्धारासाठी असलेली सद्गुरूंची आवश्यकता !

अशी सहा सात वर्षे गेली.

एवढया कालावधीत नानासाहेब चांदोरकर आणि काकासाहेब दीक्षित या दोघांची लोणावळ्यास भेट झाली. जुन्या स्नेहसंबंधास उजाळा मिळाला. काकासाहेबांना नानासाहेबांच्या सद्गुरूंचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्याप्रमाणे धारासभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने नगरास जाऊन आपले ऋणानुबंधी सरदार मिरीकर यांच्या घरी काकासाहेब उतरले. दैववशात शिरडीहून आलेले श्री. माधवराव देशपांडे यांच्यासह काकासाहेब शिरडीस गेले.

आनंद मुक्कामी काकासाहेबांचे पत्र त्यानंतर मला आले.

अत्यंत आनंदाच्या भारावल्या मनस्थितीत ते पत्र काकासाहेबांनी इंग्रजीत लिहिले होते. त्यातील एक वाक्य मला फारच भावनाविवश होऊन लिहिलेले वाटले ते वाक्य असे : लोणावळ्यास श्री चांदोरकराना मी जे म्हणालो, ते श्री बाबांच्या दर्शनाच्या वेळी पुनःपुन्हा म्हणत होतो. म्हणत होतो, " या मर्त्य देहाचे काय, सद्गुरो ! माझ्या मनाचे लंगडेपण घालवा. "

काकासाहेबांच्या मनाची भावनाविवशता त्यांचा निकटचा मित्र म्हणून मी समजू शकलो. तरीही एक गोष्ट माझ्या मनास पटत नव्हती. ती म्हणजे ज्ञानाच्या बळावर समर्थ होण्याचे सोडून विद्वान माणसाने मानसिक दुर्बलतेला शरण का जावे ? ' सद्गुरू ' ही एक परंपरागत भूमिका गृहीत धरून कोणाही माणसाचे पाय का धरावे ? खरोखर ज्ञानामुळे आणि शुद्ध चारित्र्यामुळे जर आत्मबळ वाढते तर विवेकाचा तो मार्ग टाकून अडाणी माणसाप्रमाणे एखाद्या सुशिक्षिताने कोठल्या तरी आडमार्गास का जावे ? आत्मोद्धाराचे खुळे स्वप्न त्या स्थानी उराशी का बाळगावे ?

' सद्गुरू ' ही कल्पनाच मुळात फोल, अशी माझ्या मानाची भावना होण्यास तसे एक सबळ कारणही पूर्वी घडले.

माझा एक परम मित्र हवा खाण्यासाठी म्हणून सहकुटुंब लोणावळ्यास गेला. तेथे त्याच्यावर एक आपत्ती कोसळली. ती म्हणजे त्याच्या एकुलत्या एक पुत्रास तापाने आलेला मृत्यू !

पुत्रविरहासारखे दुःख जगात दुसरे नसेल. आपला तो पुत्र वाचावा म्हणून माझ्या मित्राने अक्षरशः जिवाचे रान केले. गुरू सर्वदुःखनिवारक, तारक, म्हणून त्यालाही तेथे आणून मुलाच्या उशाशी बसविला. पण त्या गुरूने तेथे बसून केले काय ? काहीही केले नाही. केवळ फुकाचे सांत्वन मात्र केले !

हे दुःखद वृत्त माझ्या कानी आले तेव्हा मन उद्विग्न झाले. वाटले : ज्याला अनुग्रह दिला अशा एका भोळ्या शिष्याचे एवढेसुद्धा काम त्या गुरूने करू नये ? मग तो गुरू कसला ! त्याचा उपयोग काय ? एकूण गुरू, गुरूपदेश, गुरुकृपा वगैरे गोष्टी म्हणजे एक थोतांडच ! दुःखी माणसाला गुंगीत ठेवणारी ही एक भूलच !

साहजिकच काकासाहेबांनी लिहिलेले ते पत्र वाचून एक क्षणभर मला त्यांची कीव आली. वाटले, कोणी कोणावर श्रद्धा ठेवावी हा प्रश्न ज्याच्या त्याच्या मर्जीचा. मनास समाधान वाटत असेल तर काकासाहेबांनी त्या फकिरावर श्रद्धा जरूर ठेवावी. त्याचा गुरूपदेशही जरूर घ्यावा. पण गुंरूचे गुरूपण अशा गोष्टींमुळे सिद्ध होणार थोडेच ! उलट हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे धावण्याचाच हा प्रकार ! स्वतःची बुद्धी गहाण ठेवण्याचीच ही रीत !

## ३६. माझ्या जीवनाच्या ओवर्या दारी सद्गुरूंनी मंगल तोरण बांधले

शिरडीस आपण प्रथम कसे आलो, येण्यास कोणी उद्युक्त केले वगैरे गोष्टी अण्णासाहेबांना आता स्वच्छपणे आठवू लागल्या.

त्या दिवशी भोजन वगैरे लवकर आटोपून वांद्र्यास माझ्या घरी मी वामकुक्षी करीत होतो. तोच मंडळींनी येऊन मला उठविले. नानासाहेब चांदोरकरांचा शिपाई काही निरोप घेऊन आला आहे असे मला सांगितले.

मी उठून चूळ भरून बैठकीवर जाऊन सुपारी तोंडात टाकतो तोच नानासाहेबांचा नोकर दारात उभा. मला नमस्कार करून तो म्हणाला, “ साहेब वसईला निघाले आहेत. गाडीला अजून एक तास अवकाश आहे. म्हणून स्टेशनवर थांबले आहेत. हे पत्र त्यांनी आपणासाठी दिले आहे. ”

पत्र उघडून मी पाहातो तर त्यात इंग्रजीत मजकूर एवढाच : मी फिरतीवर ‌ ‌ वसईस निघालो आहे. सवड असल्यास कृपा करून मला बांद्रा स्टेशनवर भेटावे. भेटीची तीव्र इच्छा आहे.

नानासाहेबांच्या स्वभावातील मार्दव, सौजन्य, निस्पृहता, हाती घेतलेल्या कामाविषयीची कळकळ—अशा स्नेह्याचे मन कोण मोडील ? शिपायापाठोपाठ मी निघालो. पहिल्या वर्गाच्या वेटिंगरूमध्ये नानासाहेबांना भेटलो.

मी भेटण्याचा अवकाश, नानासाहेबांचा नेहमीचा विषय सुरू झाला.

म्हणाले, "काय ? शिरडीस बाबांच्या दर्शनास केव्हा येणार ? आता चालढकल नको. येण्याचा योग लवकर आणा. आपण इच्छा केली की योग येण्यास कितीसा उशीर ? काकासाहेब दीक्षितही तिकडे तुमची वाट पाहात आहेत."

नानासाहेबांच्या या आग्रहामुळे मी किंचित शरमिंधल्याप्रमाणे झालो. न राहून मनातील किंतू त्यांच्याकडे बोलूनही गेलो ! तेव्हा नानासाहेब शांतपणे म्हणाले, "बाबांविषयी माझा ग्रहही दर्शनापूर्वी याहून काही निराळा नव्हता. पण दर्शनानंतर तो पालटला. खरोखर संतांचे बाह्यदर्शन आणि अंतरंगदर्शन या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत."

नानासाहेब पुढे सांगू लागले, "आयुष्यातील बऱ्यावाईट अनुभवांमुळे मनास एक मरगळ येते. जणू मनावर विषयांच्या काजळीचा थर धरतो. पुढे पुढे ही मलिनता मनास असह्य होऊ लागते. मानमरातब, पैसा, अधिकार नकोसा होतो. सत्संगाकडे कल होतो. धर्मग्रंथ वाचावेसे वाटू लागतात. साधुसंत, तीर्थयात्रा इकडे मनाचा सर्व ओढा होतो. मनाच्या अशा आर्त अवस्थेत संतसंग घडला तर मनाची ती काजळी हळूहळू नाहीशी होते. मन आतून स्वच्छ होते. निरामय होते. पुढे हळूहळू असा अनुभव येतो की जखडलेल्या मनाची एकएक बंधने आतूनच तुटत आहेत. मोक्ष मोक्ष म्हणतात तो आनंदाचा ठेवा आपल्या हाती येत आहे. हे सारे गुप्तधन पित्याचे ऐश्वर्य पुत्रास सहजच लाभावे त्याप्रमाणे सद्गुरूंकडून आपणास यथावकाश लाभत आहे."

नानासाहेब आणि काकासाहेब यांच्या या आत्मानुभवामुळे असो; माझ्या मनाच्या कुतूहलामुळे असो; किंवा नानासाहेबांच्या आग्रहास बळी पडल्यामुळे असो – शिरडीस जाण्यास मी तात्काळ निघतो ' एवढे वचन नानासाहेबानी माझ्याकडून त्य दिवशी दुपारी घेतले आणि मगच ते वसईच्या गाडीत चढले ! जणू एक तासाचा हा अवधी बाबांनी त्यांच्यासाठी मुद्दाम निर्माण करून आणखी एक किल्ला सर करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती !

एखाद्यास दिलेला शब्द पाळणे हे सभ्य गृहस्थाचे पहिले कर्तव्य. त्या शब्दास जागून त्याच दिवशी संध्याकाळी मी निघालो. रात्रभर प्रवास करून दुसरे दिवशी सकाळी नऊ–दहा वाजण्याच्या सुमारास येथे शिरडीत येऊन पोचलो.

भाऊसाहेब दीक्षित माझी वाटच पाहात होते. साहजिकच मला पाहाताच त्यांना आनंद झाला. म्हणाले, "अण्णासाहेब, किती दिवस मी तुमची येथे वाट पाहात आहे ! शेवटी विचार केला की तुमचे येथे येणे बाबांच्या इच्छेवर अवलंबून ! असे असताना माझी इच्छा मी का चालवावी ? तुम्ही येथे आल्याचा आनंद किंवा न आल्याचा खेद तरी का मानून घ्यावा ? असो. ते पाहा तात्यासाहेब नूलकर मशिदीतून इकडेच येत आहेत. चला. ते काय म्हणतात पाहू."

टांग्यातून उतरल्यापासून बाबांच्या दर्शनाची उत्सुकता माझ्या मनास लागलेली- नानासाहेब आणि भाऊसाहेब यांनी केलेल्या वर्णनानुसार मी एक दिव्य मूर्ती मनाशी कल्पिलेली. साहजिकच ती मूर्ती कशी बोलत असेल, कशी चालत असेल, नित्याचे व्यवहार कशी करीत असेल अशी मनाची उत्कंठा. ती पुरी करण्यासाठी तर मी येथे आलो. ती पुरी झाली की माझा येथील कार्यभाग संपला! मी वांद्यास परत चाललो!

साहजिकच काकासाहेबांच्या सूचनेनुसार मीही उत्कंठेने उठलो. तात्यासाहेब नूलकरांचे शब्द मोठ्या उत्सुकतेने ऐकू लागलो. तात्यासाहेब सांगत होते, "हे आलेच पाहा बाबा सर्व मंडळीनिशी. आता वाड्याच्या कोपऱ्याशी असतील. काकासाहेब चला, चला! उठा! आधी धूळभेट तर घ्या. मग स्नान वगैरे आटोपून सावचितपणे पुन्हा दर्शन घेता येईल. बाबा लेंडीहून मशिदीत परत आल्यावर."

तात्यासाहेब नूलकरांच्या शब्दांचा माझ्या मनावर त्यावेळी काय परिणाम झाला न कळे. कारण घाईघाईने मी उठलो. धावतच वाड्याच्या दरवाजातून बाहेर आलो. बाबा उभे होते त्या ठिकाणी गेलो. अंगावरील स्वच्छ कपडे मळतील की काय याचे भानही न उरून तसाच धुळीत बाबांसमोर साष्टांग नमस्कार घातला. त्यांच्या चरणांची धूळ न कळतच मस्तकी धारण केली.

खरोखरच जी दिव्य मूर्ती मी मनाशी कल्पिलेली होती, तिच्या सहस्र पटीने सुंदर अशी ही प्रत्यक्षातील मूर्ती होती. दया–क्षमा–शांती तिच्या अंगप्रत्यंगातून ओसंडत होती. ज्ञान–वैराग्य–भक्ती तिच्या मुखमंडळावर लिहिली होती. सत्त्व–रज–तम या त्रिगुणांनी अंकित असूनही ही मूर्ती त्रिगुणांच्या पलिकडील होती.

क्षणभर मला वाटले की साक्षात परब्रह्मच मानवरूप घेऊन आपल्या पायांनी चालत आहे. सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वव्यापी असे ते निर्गुण निराकार ब्रह्म मानवी मर्यादा लटकेपणाने स्वीकारून भक्तांशी हास्यविनोद करीत आहे. जे पूर्ण बंधनातीत, ते मानवी व्यवहाराच्या बंधनात अडकून खोटे खोटेच बद्ध झाले आहे!

ती मूर्ती पाहून माझी तहान–भूक हरपली. डोळे निवाले. इच्छा–वासना–आकांक्षा मन विसरले. तटस्थ होऊन त्या मूर्तीकडे मी पाहातच राहिलो. आनंदाने परिपूर्ण होऊन आनंदाश्रूंच्या रूपाने निथळता मी निथळता मी स्तब्ध झालो. अवाक् झालो.

आयुष्यात आजवर अनेक माणसे भेटली. माझ्या सुखात आणि दुःखातही ती माणसे सहभागी झाली. त्यांचे उपकार या जन्मी फिटणार नाहीत. पण ज्यांनी मला सद्गुरूंच्या चरणाशी आणले, सुखदुःखाच्या आणि जन्ममरणाच्या पैलथडी आणून मला पोचते केले, त्या सुहृदांचे ऋण फिटणे केवळ अशक्य आहे.

खरोखर कित्येक जन्म पुण्य जोडावे तेव्हाच कोठे एखाद्या जन्मात सद्‌गुरूचे शुभ चरण दृष्टीस पडायचे. पण ते दृष्टीस पडूनही एखाद्यास त्यांचे मूल्य अज्ञानामुळे कळले नाही, किंवा कोणी सांगितले नाही तर त्या निष्फळ दर्शनाचा उपयोग तरी काय ? काशिक्षेत्री जाऊन श्रीविश्वेश्वराचे दर्शन न घेता परत आलेल्या माणसा-सारखाच हा प्रकार !

सद्‌गुरूंची थोरवी, त्यांचे अनंतत्व, कृपासामर्थ्य यांचा प्रत्यय आज मला येत असला तरी त्यावेळी त्याचे काय ! सद्‌गुरूंच्या दर्शनाने क्षणभर दिपलो, तरी वृत्ती एखाद्या हूड मुलासारखीच होती. अंगात वादविवादाची खुमखुमी होती. त्यामुळे वाड्यात परत आलो आणि बाळासाहेब भाट्यांशी वाद सुरू केला : दैव श्रेष्ठ की कर्तृत्व श्रेष्ठ !

दोन शाळकरी मुलांनी करावा असा हा वाद ! त्यामधून निष्पन्न काय होणार ! अहंकार दुराग्रह, परमताविषयी तुच्छता याविना त्यामुळे दुसरे काय साधणार !

होता होता वादाची गाडी घसरली ती गुरूपदावर ! गुरूपदाच्या फोलपणावर ! ‘ स्वतःचा उद्धार स्वतःच करावा ’ हे श्रीमत भगवद्गीतेतील अवतरण उद्‌धृत करून मी म्हणालो, “ सारासार विचार करण्याची बुद्धी आपणास लाभली असताना तिचा उपयोग आत्मोद्धारासाठी न करता जो गुरूला शरण जाऊन अंधपणे त्याच्या हातचे बाहुले बनतो त्या करंट्याला काय म्हणावे ! गुरू झाला तरी तो अशा मूर्खांपुढे काय रडणार ! ”

सद्‌गुरूंच्या पवित्र स्थानी येऊन मी पढतमूर्खाने असा वाद बाळासाहेब भाट्यांशी दोन तास घातला ! परंतु त्यातून कंठशोष होण्याविना काहीच निष्पन्न झाले नाही. अखेरीस काकासाहेबांनी येऊन मला आठवण दिली. म्हणाले, “ अण्णासाहेब, मशिदीकडे जाण्याची आपली वेळ झाली. येता ना तुम्ही ? ”

मग कोठे मी शुद्धीवर आलो. काकासाहेबांना म्हणालो, “ या वादाच्या नादात मूळ गोष्ट मी विसरूनच गेलो. चला. निघूयाच लगेच. ” अंगावर कोट चढवून, गळ्याभोवती उपरणे टाकून आम्ही दोघे मशिदीकडे आलो, तेव्हा बरीच मंडळी बाबांच्या समोर हात जोडून नम्रपणे बसलेली दिसली. त्या सर्वांशी बाबा मनमोकळया गप्पा मारीत होते. कोणाकोणाला नाजुक रेशमी चिमटेही घेत होते. जणू बाबांच्या या शिळोप्याच्या गोष्टी म्हणजे साखरेतून, मधातून, तुपातून कोणाकोणाला दिलेले मात्रांचे एक–दोन–तीन असे वळसे होते !

मशिदीच्या त्या चार पायऱ्या चढून भाऊसाहेब दीक्षित वर गेले. त्यांच्या पाठोपाठ मीही वर गेलो. बाबांच्या चरणी मस्तक ठेवून आम्ही दोघे त्यांच्यासमोर बसलो. तोच बाबा भाऊसाहेबाना म्हणाले, “ काका, मघा वाड्यात काय चालले होते ? कशाचा वाद घेऊन ते दोघे भांडत होते ? शेवटी काय म्हणाले हे–हे हेमाडपंत ! ”

समोर येणाऱ्या माणसाना टोपण नावे देण्याची बाबांना सवय. कोणाला 'काका' म्हणतील कोणाला 'नाना' म्हणतील. कोणाला 'तात्या' म्हणतील. स्त्रियांनाही 'मामी' 'काकी', 'मावशी' अशा नावाने संबोधतील. माधवरावांचे नाव त्यांनी 'शामा' ठेवले. आता माझ्याकडे साभिप्राय पाहात, माझ्या एकंदर स्वभावाचे आणि वृत्तीचे वर्णन करावे त्याप्रमाणे ते मला नवीन नाव बहाल करीत आहेत–'हेमाडपंत !'

तेराव्या शतकात देवगिरीच्या यादव राजांच्या पदरी हेमाद्रिपंत नावाचा एक विद्वान, चतुर, राजकारण धुरंधर पुरुष होऊन गेला. कोठे तो थोर पुरुष आणि कोठे मी ! असे असताना बाबांनी माझे हे नामकरण का करावे ? या नामकरणामागे बाबांचा हेतू कोणता ?

बाबांच्या त्या नूतन नामकरणामुळे त्यावेळी मी गोंधळलो. लज्जित झालो. मान खाली घालून बसलो. आज विचार करता वाटत आहे की माझी मान उंच करण्यासाठीच ते शब्द त्यावेळी बाबांनी उच्चारले. जणू त्या हेमाडपंताप्रमाणे काही सत्कृतीमुळे माझे नाव उज्ज्वल राहावे असा आशीर्वादच बाबांनी मला त्यावेळी दिला.

बाबांचे प्रथम दर्शन घडले तो सकाळचा क्षण आणि आताचे हे नूतन नामकरण ! जणू या दोन घटनांमुळे ओक्या ओक्या असलेल्या माझ्या जीवनाच्या दारी बाबांनी मंगल तोरण बांधले ! परंतु त्यावेळी हे ध्यानी आले नाही. ध्यानी आले ते इतकेच की नानासाहेब आणि काकासाहेब यांच्या सद्गुरूंचे दर्शन घडले ! मित्रकर्तव्याला जागून दिलेला शब्द मी पाळू शकलो !

आज वाटते की खरोखर सद्गुरूंची लीला अगाध आहे. अतर्क्य आहे. कारण एखाद्या उनाड मुलास वडिलांनी खेचून घरी आणावे, त्याप्रमाणे बाबांनी मला शिरडीस खेचून आणले !


## जानेवारी १९७५ च्या अंकाची झलक

- श्री साईबाबांचे सहवासातील संत श्री दासगणू महाराज यांचे पुण्यस्मरण.
- साईभक्तांची श्रद्धास्थाने या लेखमालेत मुंबईतील वरळीचे श्री साईमंदिर.
- विख्यात संगीत दिग्दर्शक श्री. सी. रामचंद्र यांची साईभक्ती
- डॉ. के. भ. गव्हाणकर यांचा 'साकोरी'वर रंजक लेख
- होरालंकार शं. वा. देवधर यांच्या लेखमालेचा पाचवा हप्ता
- श्री. र. श्री. पुजारी लिखित साईनाथ चालू लेखमाला
- श्री. द. शं. टिपणीस यांचा चिंतनशील विचारप्रवर्तक लेख
- श्री. मा. ग. गोरे, श्री. प्रकाशभाई दोशी यांचे बाबांच्याबद्दलचे छोटेखानी लेख

याशिवाय साईभक्तांनी बाबांच्यावर रचलेल्या अनेक भावमधुर कविता, पदे, अभंग आणि आरत्या इ० भरगच्च मजकूर

**पृष्ठे ४८** **किंमत ६० पैसे**

कवाड संप्रदायाचे संस्थापक

# "श्रीचिद्घन स्वामी"

— डॉ. भालचंद्र आकलेकर

**भिवंडीहून चार मैलावर कवाड गावी श्रीचिद्घन स्वामी नावाचे एक थोर संत होऊन गेले. त्यांच्यामागे कवाड संप्रदाय सुरु करण्याइतपत सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले होते. त्यांची जन्मशताब्दी १९६७ साली थाटात साजरी झाली. त्यांचा परिचय करून देत आहोत.**

## करंबोवणे गावी केतकर कुळात जन्म

श्रीचिद्घन स्वामी महाराज उर्फ सखाराम बुवा कवाडकर यांचा जन्म केतकर घराण्यात रत्नागिरीतील करंबोवणे गावी ज्येष्ठ शुद्ध ८ शके १७२३ रोजी झाला. ते पुढे कवाड येथे स्थायिक झाल्याने त्याना कवाडकर संबोधण्यास येऊ लागेल.

सखाराम बुवांच्या वडिलांचे नाव हरिपंत केतकर व आईचे नाव गोपिकाबाई होते. गोपिकाबाई या देवभोळ्या होत्या त्यांनी रामप्रभूला २५ लक्ष प्रदक्षिणा घातल्या. सासू-सासरे दीर व इतर वडिलांची सेवा केली. तिला काशिनाथ, पांडु व मोरु असे तीन पुत्र झाल्यावर अनु, सई, मनु व भीमा या चार कन्या झाल्यानंतर आठव्या वेळेस सखाराम जन्मले तेच आपले सखाराम बोवा होय. बाळपणी सखारामाच्या अंगावर फारसे बाळसे नव्हते—विशाल नेत्र, विस्तीर्ण वक्षस्थळ, लहान कपाळ दीर्घ बाहू व रमणीय मुखश्री असे त्यांचे स्वरूप होते. त्याची अंगकांती गौर होती. बाराव्या दिवशी त्याच्या मातोश्रीला अंतर्यामी श्रीराम प्रेरणा झाली त्याप्रमाणे तिने त्याचे नाव सखाराम ठेवले. सखाराम बालपणी अत्यंत चपल व खेळकर होते त्याना रडणे माहित नव्हते, ते लहानपणी सुस्वर गायनही करी.

## सखाराम बुवांचे बालपण

सखारामला पाचवे वर्ष लागले. त्या गावाजवळच टेकडीवर बिवली गावी लक्ष्मी केशव मंदिर होते. तेथे त्याचे मातापिता निजायला जात अर्थात त्याच्याबरोबर त्यांचा मुलगा सखाराम असे. तेथे तो देवाची मूर्ती पहात बसे. मूर्तीकडे सतत पहाण्याचा सखारामाला छंद लागला. रात्री सर्व माणसे झोपी गेल्यावरही सखाराम मूर्तीकडे

नखशिखात टक लावून पाहात बसे मध्येच कोणी तरी जागे होऊन सखारामाकडे पाही व विचारी ' अरे तू झोपत नाहीस, देवापुढे काय करतोस ? सखाराम म्हणे, दिवा मंद झाला आहे, तो सारून वात नीट करतो आहे. तो माणूस झोपण्यास जाई तरी सखाराम देवाचे ध्यान मनात ठसवित असे.

वयाच्या सातव्या वर्षी त्यांची मुंज झाली. त्यापूर्वी त्यानी वडिलाकडून मोडी लिपी आत्मसात करून घेतली. नंतर त्रिकाळसंध्या ब्रह्मयज्ञ, अग्नी ब्राह्मण धर्म करण्यास प्रारंभ केला. त्यांची कुशाग्र बुद्धि पाहून वडिलास आनंद होई. विष्णु सहस्त्रनाम गीत त्यानी मुखोद्गत केली. गायत्री, हरी राम केशव शिव नारायण इत्यादि जप तो रात्रंदिवस करू लागला पांडव प्रताप, भक्त विजय, भक्त लिलामृत इत्यादि ग्रंथ कोणी वाचत असेल तर सखाराम तेथे जाई. आख्यान ऐके व मनात ठसवी हे सारे ग्रंथ ऐकून आपणही रामदास तुकारामासारखे संत व्हावे असे वाटू लागले.

## खाडीत घडलेला अद्‌भुत चमत्कार

अशा स्थितीत एके दिवशी सखारामाला त्याचे वडिलानी गावाबाहेर खाडी-पलीकडील आपल्या शेतातून भात पेंढा घरी आणण्यासाठी पाठवले. सखाराम दोन होड्या व नोकर बरोबर घेऊन गेला. दोन्ही होड्यात भात पेंढा भरून ती मंडळी खाडीतून घरी यावयास निघाली. मध्ये येताच एकाएकी मोठे वादळ झाले त्या वादळामुळे होड्या गरगर फिरू लागल्या. होडीचे बंद तुटले. होडयात पाणी येऊ लागले. होड्या बुडून आपण मरणार म्हणून सर्व नोकर घाबरून रडूं लागले. पण सखाराम मुळीच घाबरला नाही. तो म्हणाला, अरे रडता काय ? सर्वत्रांची काळजी घेणारा श्री लक्ष्मी केशव समर्थ आहे. त्याचा धावा करा तो आपल्याला या संकटातून सोडवील. नोकरांचा विश्वास नसल्यामुळे त्यांचे रडणे चालूच होते. सखारामने मात्र मनःपूर्वक ईशस्तवन केले. व या संकटात माझा अंत पाहू नकोस. असे त्याने म्हणताच शंभर हातावरील वारा पडला लाटा शांत झाल्या व नोकरासह सखाराम सुखरूप घरीं आला. चमत्कार हा की शंभर हाता पलिकडे तुफान वादळ चालू होते.

## तारापूर येथे वेदाभ्यास केला

या प्रकारानंतर सखाराम तारापूर येथे वेदमूर्ती जगन्नाथशास्त्री यांच्याकडे पुढील अध्ययनासाठी आले. तेथील अध्यायन पूर्ण झाल्यावर ते अलिबागेस न्याय शास्त्राचे अभ्यासासाठी राहिले. नंतर पुण्यात विश्राम बागेतील पाठशाळेत त्यानी योगाभ्यास केला. पुढे नाशिकला वेदमूर्ती रघुनाथ भटजी मोघे यांजकडे गेले. त्यांच्याकडून पूर्ण प्रसाद घेतला.

सखाराम तारापूरास असतानाच त्याचे लग्न करावयाचे ठरविले. सखारामचे बंधूनी-पांडू भाऊनी वडिलांच्या आज्ञेवरून सखारामास लग्नास तयार केले. अखेर पर्शुराम गोंधळेकराच्या मुलीशी त्याचे लग्न झाले, लग्न झाल्यावर सखाराम परत तारापूरास

आले. त्यांचे वैराग्य वृद्धिंगत झाले. लग्न झाल्याबद्दल त्याना पश्चाताप वाटू लागला. या संसारापाशातून सोडव. तुला लक्ष नमस्कार घालीन. त्याने प्रार्थना केली. अखेर दिवसातच त्याच्या पत्नीची प्रकृती अचानक बिघडून ती दगावली. सखाराम संसारातून मुक्त झाल्याने आनंदाने नाचू लागले.

पुढे काही दिवस त्यानी रात्रंदिन ब्रह्माभ्यास केला. नंतर ते वडिलबंधूना म्हणाले की मी नाशिकला जातो. त्याच्या बंधूनी सांगितले की लांब जाऊ नकोस जवळच राहा.

## कावडला आगमन

ते ऐकून सखाराम निघाले ते शहापुरास गंगेच्या कुंडावर आले. तेथे मनाजोगे स्थान वाटेना. तीन रात्री तेथे राहून ते माहुलला आले. तेथेही त्यांना बरे वाटेना. तेथून ते कल्याणला आले. तेथून ते अनगावास निघाले. तेथील एका जाणकार ब्राह्मणाने त्यांची वृत्ती ओळखून सांगितले, येथून पाच मैलावर कवाड म्हणून गाव आहे. तेथे येत असला तर चला. आपणास ते गाव योग्य वाटेल. ते ऐकून सखाराम त्याचेबरोबर कवाडला आले. त्याना ते गाव बरे वाटले.

गाव निसर्गरम्य होते. मैल अंतरावर नदी. गावाजवळ दाट झाडी. गावात दोन शिवालय, एक राममंदिर गावात चार अग्निहोत्री, ऋग्वेदी आपस्तंभ याज्ञिक वैदिक, शास्त्री यांची घरे होती. वस्ती फारच कमी होती. हे पाहून सखारामानी मोठ्या आनंदाने गदाधर भटजी घांगुरडे अग्निहोत्री याचे घरी प्रदान केले. ऐन तारुण्य, नम्रता, स्वच्छता सात्विकता पाहून गदाधर भटजी प्रसन्न झाले. त्यानी त्याना प्रथम प्रसाद दिला जेऊ घातले. भोजनोत्तर महाराजांची चौकशी केली व आपल्याकडे ठेवून घेतले. सखाराम महाराज वैशाख शुद्ध प्रतिपदा शके १७४६ (१८२४) रोजी कवाडला आले ते कायमचे ते तेथे ४३ वर्षे राहिले.

सखाराम महाराज ब्राह्म महुर्ती उठून प्रातःर्विधी उरकून नदीवर स्नानास जात. तेथें संध्यादि कर्मे करून कुठेतरी निवास स्थळी योगाभ्यास करीत – दुपारी बारा वाजता गावात येत. पाच घरी माधुकरी मागत. भोजनोत्तर अध्यात्मग्रंथ वाचन करून काही विद्यार्थ्यांना पाठ देत. नंतर पुनः अरण्यात जात. सायंकाळी संध्यादिक उरकून गावात परतत. रात्री बराच वेळ भजन करून झोपी जात.

## कवाड येथे केलेली तपश्चर्या

महाराजांची प्रसिद्धी थोड्याच काळात सर्वत्र पसरली. त्याचे दर्शनास व अध्ययना-करिता दूरदूरची मंडळी येऊ लागली. दर्शनार्थ येणारे अगदी गरिबापासून श्रीमंतापर्यंत संस्थानिकापर्यंत असत. प्रत्येकास योग्य तो उपदेश महाराज करीत. महाराज अत्यंत विरक्त व निरपेक्ष असल्यामुळे येणाऱ्या भाविकानी पुढे ठेवलेले जिन्नस गरीबास वाटून टाकीत. शके १७५० साली ते काशीस गेले तेथे एक वर्ष राहून परतले.

महाराजानी केलेल्या शेकडो चमत्काराच्या कथा ऐकायला मिळतात. योग सामर्थ्य निदर्शक कथा पुष्कळच प्रसिद्ध आहेत. महाराजांच्या शिष्यवर्गात अनेक विद्वान गृहस्थ होते. महाराजाच्या दर्शनार्थ धारचे संस्थाधिपती सन १८६३ मध्ये आले होते श्रीमंत खंडेरायमहाराज गायकवाड बडोदेकर यांनीही १८६४ साली महाराजांचा आशीर्वाद घेतला होता. दळणवळणाची साधने नसताही महाराजांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. यावरून त्याचे श्रेष्ठत्व दिसून येते. शेकडो लोकांचा उद्धार करून भाद्रपद वद्य सप्तमी शके १७८९ (सन्‌ १८६७) रोजी महाराज समाधीस्त झाले. निर्वाणापूर्वी थोडा वेळ त्यानी चतुर्थाश्रम स्वीकारला व चिद्‌घन नाव घेतले.

## काही चमत्कार

मुंबई विठ्ठलवाडी संस्थानचे मालक नारायण बुवा याना भूतबाधेने पछाडले होते त्यांच्या कुटुंबियानी मुंबईहून त्याना सखाराम बुवाच्या पाया पडण्यास आणले. सखाराम वानी लक्ष्मीनारायणाचा अंगारा भ्रमिष्ट नारायणरावाना दिला. नंतर त्यांना आपल्या संपदायाची दीक्षा दिली. भिवंडीचे बापूसाहेब दातार मामेलदार सखारामबुवांचे निष्ठावान भक्त होते ते एकदा सपत्निक दर्शनास आले. बाईना संतती नव्हती. ती झाली. मामलेदारावरील निपुत्रिकाचा कलंक गेला. केळवे माहीमचे वा. गो. दळवी याच्या घराण्यात तीनचार वर्षे ब्रह्मपुरुष बाधा होती. ती महाराजांनी घालवली. नारायण भट सखारामबुवास भेटण्यास येत. एकदा ते नेहमीप्रमाणे भेटण्यास आले होते. बुवानी त्यांना सांगितले की कोठेही न थांबता घरी जा. पण नारायण भट भिक्षुकीच्या आशेने वाईस थांबले. ते घरी गेले तेव्हा त्याना आपली पत्नी मरण पावल्याचे कळून आश्चर्याचा धक्काच बसला !

## महाराजांचे लोकप्रिय पद

महाराजानी कविताही बऱ्याच केल्या आहेत. 'सारसंग्रह' बलराजस्तोत्र, वज्रेश्वरीची आरती, वज्रेश्वरी वर्णन अनेक भजने व पदे केली. 'आनंद रस मी प्याला' हे त्यांचे पद फारच गाजले ते वानगी दाखल देत आहोत.

आनंदरस मी प्याला ।
भवताप शांतचि झाला ॥
अनंत कोटी कल्मषपाश ।
पावे एका समयी नाश ॥
दृढ धीरता सद्‌गुरुची कांस ।
निजगुण सांगूनि गेला ॥ १ ॥
आता मजहि कैचे ध्यान ।
विसरुनि गेले समुळही भान हो ।

श्रवण कराया नाही मज कान ।
संकल्पचि निमाला ॥ २ ॥
मेली यद्यपि मोह माय ।
कोन त्याचे दृढ व्यवसाय ॥
रामसखा तो शोभेल काय ।
चिन्मय होऊनि ठेला ॥ ३ ॥

महाराजांचे सुदुष्कृता विनाशक विपद विमोचन हे पदही प्रसिद्ध आहे.

## महाराजांचा शिष्य परिवार

महाराजांच्या समाधीवर त्यांचे पट्टशिष्य कै. ह. भ. प. रामकृष्ण माटे यानी परिश्रमपूर्वक शिक्षावृत्तीने व कीर्तन पुराणे सांगून रक्कम उभी केली. त्यातून महाराजांच्या समाधीची व सभामंडपाची सुंदर इमारत उभारली. गाभाऱ्यात समाधी जवळ महाराजांचे उपास्य दैवत श्रीलक्ष्मी केशवच्या मूर्ती असून त्यापुढे समाधी आहे. मूर्ती व समाधी फारच सुंदर आहे. दरसाल भाद्रपद वद्य ५ ते ७ पर्यंत सद्गुरुच्या पुण्यतिथीचा उत्सव होतो. मार्गशीर्ष शुद्ध १४ ते वद्य प्रतिपदेपर्यंत दत्तजयंती उत्सव होतो. यावेळी कवाडला मोठी जत्रा भरते. अनेक विद्वान प्रवचनकर, कीर्तनकार मंडळी जमतात, या उत्सवाचा खर्च निम्मे जमिनीच्या उत्पन्नावर व निम्मे समर्थ सांप्रदायाप्रमाणे होत असतो. गेली १०३ वर्षें हा उत्सव चालू आहे.

कवाड हे गाव ठाण्याहून १३ मैल कल्याणहून १० मैल व भिवंडीहून ४ मैलावर सडकेवर आत दोन फर्लांगावर आहे. वज्रेश्वरी, वाडे येथून एस. टी. ने जाता येते. सखाराम महाराजांच्या चरित्रास त्यांचे एक भक्त शताब्दि उत्सव समितीचे सदस्य श्री. विनायक शिवराम उकिडवे यानी कवाड संप्रदायाची सुंदर माहिती दिली आहे. ती वाचकानी मूळातून वाचावी.

**श्री साईलीला** लेखक – कवी – वाचक यांचे स्नेहसंमेलन प्रथमच भरणार
विशेष माहिती पुढील अंकात वाचा.

# श्रीसद्‌गुरुंची राजधानी–नृसिंहवाडी

● श्री. सुभाष चंदवणकर

मराहाष्ट्र राज्यात श्री सद्‌गुरुंची जी परम पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत, त्यामध्ये नरसोबाची वाडी वाडी किंवा नृसिंहवाडी हे एक कडकडीत क्षेत्र आहे. हे स्थान कृष्णा–पंचगंगा नदीच्या संगमावर असून अत्यंत निसर्गरमणीय असे आहे. जिथे जिथे दत्ताची स्थाने आहेत त्या त्या ठिकाणी सत्यं, शिवं, सुंदरम्‌चा भक्तांना साक्षात्कार झाल्यावाचून राहत नाही. श्री क्षेत्र नृसिंहवाडी हे स्थान महान तपोनिधि श्री नृसिंहसरस्वती दत्तमहाराजांचे तपश्चर्येचे स्थान आहे. श्रीनी येथे बारा वर्षे औदुंबराच्या वृक्षाखाली तपानुष्ठान केले. त्यामुळे येथे औदुंबराला कल्पवृक्षाची व नृसिंहवाडीला भूवैकुंठाची योग्यता आली असून दिवसे दिवस या स्थानाचा महिमा वाढता आहे. नृसिंहवाडी प्रमाणेच कारंजा, औदुंवर आणि गाणगापूर ही तीन क्षेत्रे पण याच नृसिंह सरस्वतींच्य वास्तव्यामुळे प्रसिद्धी पावलेली आहेत. नृसिंह सरस्वती हे दत्तात्रेयाचे दुसरे अवतार होत. त्यांच्यापूर्वी श्रीश्रीपाद श्रीवल्लभ होऊन गेले. त्यांना दत्ताचा प्रथम अवतार मानतात.

नृसिंहवाडी हे क्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ पेट्यात आहे. मिरज–कोल्हापूर रेल्वे फाट्यावरील मिरजेपासून निघाल्यानंतर पहिलेच स्टेशन जे लागते त्याचे नाव आहे जयसिंगपूर. येथे उतरून बसने श्रीक्षेत्री जाता येते. स्टेशनपासून क्षेत्र नऊ मैल आहे व स्टेशनापासूनच तिथे जाण्यास बसेस मिळतात. शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी व सरस्वती अशा पंचगंगा व कृष्णा व वेण्णा अशा दोन नद्या अशा एकूण सात नद्यात कृष्णा नदीच्या परम पावन संगमावर हे क्षेत्र वसलेले आहे. या सात नद्यात कृष्णा ही प्रथम प्रगट झाली असून इतर नद्या नंतर उद्गम पावलेल्या आहेत; व त्या कृष्णेला मिळालेल्या आहेत. महानदीची सारी लक्षणे कृष्णेसच लागू असल्याने साक्षात् विष्णुतनू श्रीकृष्ण अशी ही महानदी आहे. ही नदी या क्षेत्रात दक्षिण वाहिनी आहे. डावीकडून उत्तरेकडे सुमारे फर्लांगावर ही कृष्णा पश्चिमवाहिनी होते. त्या स्थानास शुक्लतीर्थ असे नाव आहे. महापातकांचा नाश करणाऱ्या या तीर्थाचे महात्म्य येथे फार मोठे आहे.

या क्षेत्रास तीन घाट आहेत! एक श्रीमंदिराचा, दुसरा संगमाचा व तिसरा संगमा नंतरचा. येथले सर्व घाट प्रशस्त आहेत. या घाटाला चार टप्पे आहेत. काही पायऱ्या चढल्यावर रुंद फरसबंदी आणि त्या नंतर पुन्हा पायऱ्या अशी एकूण चार टप्प्यांची चढती घडण आहे. या घाटाशी नदीचे पाणी वहाते आहे.

कृष्णेच्या पैलतीरावर औरवाड व गौरवाड या नावाची दोन गावे आहेत. ही दोन गावे विजापूरच्या आदिलशहाने वाडीच्या दत्तपूजेसाठी इनाम दिलेली आहेत. पैलतीरावरचे औरवाड म्हणजे गुरुचरित्रात वर्णन केलेले अमरापूर होय. या अमरापुरात स्वयंभू शिवलिंग असल्याने श्रीशंकरस्थान म्हणून या स्थानाचे महत्व आहे. त्या ठिकाणास आज नरसोबाची वाडी असे म्हणतात, ते ठिकाण एके काळी अमरपूरातच समाविष्ट करण्यात आलेले होते. या अमरपूराचा त्याच्या सान्निध्यातील कृष्णा–पंचगंगा संगमाचा महिमा गुरुचरित्रात पुढीलप्रमाणे वर्णिलेला आहे :—

**पंचगंगातीर । प्रख्यात असे पुराणांतर ।**
**पांच नामें आहेति थोर । सांगेन ऐका एकचित्तें**
**शिब, भद्रा भोगावती कुंभीनदी सरस्वती ।**
**'पंचगंगा' ऐसी ख्याति । महापातक संहारी ॥**
**ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचिया संगा ।**
**प्रयागाहूनि असे चांगा । संगमस्थान मनोहर ॥**
**अमरापूर म्हणिजे ग्राम । स्थान असे अनुपम ।**
**जैसा प्रयाग संगम । तैसे स्थान मनोहर ॥**
**वृक्ष असे औदुंबरु । प्रत्यक्ष जाण कल्पतरु ।**
**देव असे अमरेश्वरु । तया संगमा षट्कुळी ॥**

सुमारे ५०० वर्षांपूर्वी भगवान श्री दत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ यांनी वऱ्हाडातील अकोला जिल्ह्यातील कारंज नगरींत माधव विप्रा पासून अंबासतीच्या उदरी भगवान श्रीनृसिंह सरस्वती नामक परमदिव्य अवतार लोकोद्धाराकरिता धारण केला. आपल्या दिव्यलीला प्रगट करीत या स्थळाचा महिमा वाढविण्याकरिता श्रीनृसिंह सरस्वती येथे संगमावरील औदुंबर वृक्षाखाली तपश्चर्या करीत थोडी थोडकी नव्हेत तर चांगली बारा वर्षे राहिले. प्रत्यक्षपणे श्रींचे वास्तव्य या स्थळाइतके कुठेच झालेले नाही. म्हणून नृसिंहवाडीला 'श्रीदत्ताची राजधानी' असे म्हणतात.

वाडी येथे बारा वर्षे काढून अनेक दीन दुःखितांच्या जीवनात सुखासमाधानाचे मळे फुलवून, अनेकांची संकटे नष्ट करून श्रीगुरु पुढे गाणगापूर येथे गेले. वाटेत विजापूरच्या आदिलशहाला जन्मांतराचे स्मरण देऊन त्यांनी कृतार्थ केले.

कृष्णा नदीच्या घाटाच्या पहिल्या ठाण्यावरच १२ फूट लांब व २३ फूट रुंद असे परमपवित्र दत्त मंदिर आहे. या मंदिरात असलेल्या पादुकांना 'मनोहर पादुका' असे म्हणतात. पादुकावरील मंदिर आठ खांबावर उभे असून त्याची उंची अगदी लहान आहे. या मंदिरावर शिखर नाही पण धाब्याच्या घरासारखे सपाट छप्पर आहे. मंदिरामागचे चार खांब भिंतीतच गेलेले आहेत. या मंदिराच्या मागील बाजूस

औदुंबराचा निष्पर्ण पार आहे. मंदिराच्या उभय बाजू समोरच्या कोपऱ्यावर दगडी बांधणीची तुळशी वृंदावने आहेत.

मंदिराच्या मध्यभागी मनोहर पादुकांचा लहानसा गाभारा आहे. दर दिवशी दुपारी बारा वाजता या पादुकांची महापूजा होते व त्या प्रसंगी पुजारी लोटीभर दुधाचे स्नान त्यांनो घालतो. यावेळी पादुकांचे दृश्य मोठे मनोहर दिसते; व सरस्वती गंगाधरानी वर्णिलेला पुढील गुरुमहिमा त्याला आठवतो तो असा —

**जो कोण भजेल श्रीगुरु ।**
**त्यासी लाधेल इहपरु ।**
**अखंड लक्ष्मी त्याचे घरी ।**
**अष्टैश्वर्यै नांदती ॥**

मंदिरावर कोणत्याहि प्रकारचे शिखर नाही याचे कारण यवनराजाचे नाव रहावे म्हणून श्रीच्या मंदिरावर शिखर न बांधणे व श्री चरणावर मुसलमान पद्धतीचे महावस्त्र घालणे अद्यापहि यवन भक्ताचा मान म्हणून पुजारी चालवीत आहेत.

मनोहर पादुकांचे दर्शन घेऊन डावीकडे वळले की एक छोटेसे शिखर असलेले राममंदिर आहे व त्यापुढे एक बैठा मांडव आहे. मंदिरात राम आणि सीता यांच्या उभ्या मूर्ति आहेत. या राममंदिरापासून घाटाच्या पायऱ्यांच्या दुसऱ्या थरापर्यंत अगदी ओळीने अशा आठ ओवऱ्या आहेत. राम मंदिराजवळ उभे राहिल्यावर डावीकडे कृष्णा-पंचगंगा-संगम आणि त्या पलीकडे कुरुंदवाडच्या बाजूने संगमावर उतरण्यासाठी असलेला कुरुंदवाड घाट दृष्टीस पडतो. वाडी येथील संगमाच्या पाण्यातील चौसष्ट योगिनी श्रीनृसिंह सरस्वती यांची सेवा करीत आहेत असे गुरुचरित्रात म्हटलेले आहे. शके १३४४ ते १३५६ हा बारा वर्षांचा काळ श्रींनी या भूमीत घालविला आहे.

त्यांच्या वास्तव्यातील येथली एक घटना सांगण्यासारखी आहे. अमरापुरात एक ब्राह्मण जोडपे चांगले वेदविद्यानिपुण होते. गावातील इतर ब्राह्मणांच्या घरी कोरडी भिक्षा मागून हे दांपत्य कशीबशी उपजीविका करीत असे. त्यांना कधी भिक्षा मिळे तर कधी मिळत नसे. त्यामुळे अधून मधून या कुटुंबाला उपवास काढावे लागत. तेव्हा या उपासाच्या दिवशी आपल्या दाराच्या अंगणात असलेल्या घेवड्याच्या वेलावरच्या शेंगांची भाजी करून ही दोघे दिवस कंठीत त्यावरच राहात. श्री सद्गुरु गावात भिक्षेसाठी जात असत. एकदा त्यांना या ब्राह्मणाची हकीकत कळली. दुसऱ्या दिवशी ते त्या ब्राह्मणाच्या घरी गेले. पण त्या बिचाऱ्यांच्या घरी काहीच नव्हते. त्यांनी या घेवड्याच्या शेंगा शिजवून श्रींना जेवू घातले. श्रीनी भोजन केले. त्या उभयताना आशीर्वाद दिला व ते घराबाहेर पडले. जातांना त्यांनी त्यांच्या अंगणातला घेवड्याचा वेल समूळ उपटून टाकला. हे पाहून त्या ब्राह्मणास अतिशय वाईट वाटले. पण या घेवड्याच्या भरवशावर राहून काम न करण्याची चुकार वृत्ती नि आळशीपणा हा त्या

ब्राह्मणाचा दुर्गुण नष्ट झाला व तो उद्योगी बनला. अल्पावधीत त्याला ऐश्वर्य लाभले. श्रींची दृष्टी ही अशी होती. यामुळेच की काय या पुनीत भूमीतील अणुरेणूवर श्रींच्या प्रभावाची साक्ष उमटलेली दिसून येते. आजही ही अशी भूमी अनेक दत्तभक्तांना उत्साह, स्फूर्ति आणि प्रेरणा देत राहिलेली आहे हे विशेष होय.

रोज सकाळी पाच वाजता कृष्णा घाटावरचे गुरुपादुका मंदिर उघडले जाते. त्यावेळी काकड आरती होते. नंतर श्रीची षोडषोपचारे पूजा होते. तदनंतर रामचंद्र सीता, योगी, नारायण स्वामी, गोपाळ स्वामी इ. सर्व संत महंतांची व कृष्णावेण्णांची पूजा होऊन हा कार्यक्रम संपतो. सकाळी दहा वाजता श्रींचे वस्त्र काढून पंचामृत पूजा, लघुरुद्र, महारुद्र इ. कार्यक्रम होतात. बारा वाजेपर्यंत ही सारी सेवा चालते. बारा वाजता श्रींची महापूजा मोठ्या थाटाने होते. त्यावेळी पुजारी पादुकांवर लोटीभर दूध ओततात. हा मंगल सोहळा पाहाण्या जोगा असतो. पुढे महानैवेद्य होऊन श्रींचा कट्टा धुतला जातो. दुपारी तीन वाजल्यापासून सायंकाळ पर्यंत पुराण कीर्तनाचे कार्यक्रम होतात. सायंकाळी श्रीची महापूजा मोठ्या थाटाने होते. त्या पूजेस पंचोपचार पूजा असे म्हणतात. संध्याकाळी आरतीच्या वेळेस धुपाचा वास दरवळला रे दरवळला की भूतपिशाच्चाची बाधा, पिडा असलेल्या व्यक्तिंच्या अंगात वारे येते. त्यांचे अंगविक्षेप, दात–ओठ खाणे, कर्कश, कर्णकठोर ओरडणे, किंचाळणे, रडणे हे बघून तर पहाणाऱ्या भीतीच वाटते. परंतु श्रीसद्गुरुंच्या प्रभावाने ही लागलेली सारी भूते, झपाटलेली माणसे येथे खडखडीत बरी होतात. भूते त्यांचा आसरा, आश्रय सोडतात आणि कृष्णेच्या प्रवाहात खोल खोल बुडी घेतात. जाण्यापूर्वी ते आपापली गाऱ्हाणी आणि सेवा करण्यास सांगून गति घेतात. वाडीचा हा महिमा असल्यामुळे भूता–खेतांनी पछाडलेल्या मंडळींची वारी येथेच होत असते.

येथे पालखीचा सोहळा रोज होत असतो. फक्त चातुर्मासात तेवढी पालखी होत नसते. पालखीची शोभा अवर्णनीय अशीच आहे. पालखीनंतर मंत्र पुष्पांजली, तीर्थ, अंगाला अंगारा लावणे, वैदिक मंत्रांचा जयघोष इ. होऊन शेजारती होते व दिवसभराचा सारा कार्यक्रम संपतो व श्री विश्रांती घेतात.

श्रीनृसिंह वाडी येथे वेळोवेळी अनेक उत्सव साजरे केले जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदा, चैत्र वद्य सप्तमी पासून अमावास्येपर्यंत श्री नारायण स्वामी महाराजांचा उत्सव, ज्येष्ठ वद्य नवमी ते आषाढ शु. प्रतिपदा, श्री. वासुदेवानंद सरस्वती यांचा उत्सव, गणेश चतुर्थी, दसरा, गुरुद्वादशी, दत्त जयंती, पौष शु. द्वितीया, माघ शु. सप्तमी पासून दहा दिवस श्री कृष्णा उत्सव साजरे केले जातात. विशेषतः दर बारा वर्षांनी येणारा कन्यागत महोत्सव हा येथला श्रेष्ठ उत्सव समजला जातो. या प्रसंगी गुरु कन्या राशीत येतो म्हणजे जगत पावनी गंगा श्री कृष्णेस बहिणी प्रमाणे भेटण्यास येते व वर्षभर ती श्रीकृष्ण प्रवाहात नियमपूर्वक वास्तव्य करते. त्यावेळी सर्वत्र कृष्णातीरावर

स्नान कर्मादि विधि होतात. परंतु वाडी तीर्थक्षेत्री श्रींचे सान्निध्यात हे विधि करण्यात एक विशेष आनंद असल्याने येथे चिकार गर्दी होते. श्रीनृसिंहवाडी येथे श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनृसिंह सरस्वती दत्तमहाराज अखंड गुप्तपणाने वावरत आहेत. भुक्ति, मुक्ति परमार्थ जी जी वासना धरून लोक येथे सेवा करतात, त्या त्या सार्‍यांच्या वासना फलद्रूप होतात व ते लोक कृतार्थ होतात आणि आपोआपच त्यांच्या मुखातून श्रीगुरुस्तोत्र स्त्रवू लागते :—

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

नरसोबा वाडीला मनोहर पादुका मंदिराशिवाय पाहाण्यासारखे आणखीन खूप आहे. पादुका मंदिराच्या उजव्या बाजूने सगळा घाट चढून गेल्यावर श्री टेंबे स्वामींचे स्मृतिमंदिर आहे. श्री वासुदेवानंद सरस्वती हे त्यांचे संपूर्ण नाव. शके १७७६ ते १८३६ या काळात होऊन गेलेली ही प्रख्यात दत्तोपासक थोर विभूती होय. कोकणातल्या सावंतवाडी जवळ माणगाव हे त्यांचे मूळ गाव. त्यांच्या घराण्यात दत्तभक्ति ही पूर्वीप्रमाणेच होती. याचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. ते सुद्धा दत्तभक्तीत रंगून गेले. अल्पवयात त्यांनी शास्त्राचे पठण केले. पुढे वाडी हेच त्यांच्या दत्तभक्तीच्या क्षेत्रातील प्रेरणा स्थान झाले. श्री टेंबे स्वामींनी या वाडी क्षेत्री तप केले. आपल्या गावात त्यांनी दत्तमंदिराची स्थापना केली. पुढे ते वैरागी बनले. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी त्यांनी घरदार सोडले. आपल्या पत्नीसह ते यात्रा पर्यटनास निघाले. यात्रा करीत असतानाच गंगाखेड येथे त्यांची सुशील पत्नी निधन पावली. शके १८१३. पत्नीनिधनाच्या तेराव्याच दिवशी त्यांनी संन्यासदीक्षा घेतली व संन्यास धर्माचा अंगीकार केला. टेंबे स्वामींची बुद्धिमत्ता अत्यंत प्रगल्भ होती. केवळ तपाचरणामुळे त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झालेल्या होत्या. त्यांची प्रतिभा पण विलक्षण होती. त्यांनी संस्कृत व मराठी या दोन्ही भाषात दत्तोपासनेसंबधी चार हजार पानांचेवर वाङ्मय प्रसृत केले आहे. त्यांनी 'दत्तपुराण' हा संस्कृत आणि 'दत्तमहात्म्य' हा मराठी असे दोन अधिकृत ग्रंथ लिहिले आहेत. हे दोन्ही ग्रंथ दत्तचरित्र समजावून घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. 'गुरुचरित्रा'चे पण त्यांनी संस्कृतमधे रूपांतर केले आहे. त्यांच्या या भरीव कार्यामुळे आधुनिक काळात दत्त संप्रदायाला फार मोठी जागृती मिळाली आहे. नर्मदेच्या काठावर गरुडेश्वर येथे त्यांनी समाधि घेतली. टेंबे स्वामींचे वाडी येथले स्मृति मंदिर अवश्य पहाण्याजोगे आहे. स्वामीजींचे हे मंदिर १९३५ त ग्वाल्हेरच्या एक स्त्रीभक्त लक्ष्मीसाहेब जाधव यांनी उभारले. हे स्मृतिमंदिर मनोहर पादुकांच्या मंदिरा सारखे आहे. परंतु दगडी खांबाच्या मोकळ्या मंडपाला नंतर गज व जाळी बसवून मंडप बंदिस्त केला आहे, वासुदेवानंद सरस्वतींना दत्तावतार समजण्यात येते. या संबंधीचा एक प्रसिद्ध श्लोक आहे. तो असा :—

**योगींद्र जो तनय अत्रि महाऋषीचा ।**
**श्रीपाद राज पहिला अवतार ज्याचा ॥**
**जो हो पुनश्च यति सिंह नृसिंह देव ।**
**तो हाचि दत्तभगवान गुरु वासुदेव ॥**

श्री टेंबेस्वामींच्या स्मृतिमंदिरामागेच श्रीरामचंद्र योगी यांचे स्मृतिमंदिर आहे. श्री नृसिंह सरस्वती येथे येण्यापासून ते या वनात व्रतस्थ होते. नरसिंह सरस्वतींची गाठभेट होताच त्यांनी कृष्णातटाकी समाधी घेतली. ज्येष्ठ वद्य चतुर्दशी हा त्यांच्या पुण्यस्मरणाचा पावन दिवस होय. पावसाळ्याच्या दिवसात कधी कधी कृष्णेला महापूर येतो व ती दुथडी भरून वाहू लागते. अशावेळी गुरुपादुका सुद्धा कृष्णा जलात बुडून जातात. या वेळी पुजारी श्री रामचंद्र योग्यांच्या समाधीचे पूजन करून गुरुपादुका पूजनाचे श्रेय मिळवितात. योग्यांच्या समाधीच्या मागे व पुढे पिंपळाची झाडे आहेत. पुढल्या पारावर दोन शिवलिंगे, नंदी व पादुका आहेत.

टेंबे स्वामींच्या मंदिरापासून काही अंतरावर पण त्याच ओळीत नारायणस्वामी, काशीकरस्वामी, गोपाळस्वामी, मौनीस्वामी, या तपस्वी साधुपुरुषांची स्मृतिस्थाने आहेत व ती बरीच जुनी आहेत. या स्मृतिस्थानांच्या पुढे श्री. मल्हार श्री निवास वेळकोटकर यानी बांधलेला दुमजली मठ आहे. वरील समाधिस्थ साधुपुरुषात श्री नारायण स्वामी हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ते तासगाव जवळच्या विसापूरचे गार्ग्य गोत्री देशस्थ ब्राह्मण. ते उत्तमपैकी वेदशास्त्र पारंगत ब्राह्मण. त्यांनी आपल्या सर्व संसाराचा त्याग केला, कन्यांचे विवाह विधि उरकले, मुलाचा पण विवाह केला आणि मग संन्यास धर्मांत प्रवेश केला. शके १७२० च्या अमावास्येस ते समाधिस्थ झाले. नरसोबाच्या वाडीस गुरुपादुकांच्या पूजनापूर्वी या श्री नारायण स्वामींच्या समाधी स्थलाचे पूजन करावे लागते. असा तेथला प्रघात आहे. यावरून त्यांचा अधिकार केवढा होता याची कल्पना येते. त्यांचे संबंधी एके ठिकाणी टेंबे स्वामींनी म्हटले आहे.

**कृष्णा पञ्च नदी योगेऽभ्यर्च्य श्रीदत्तपादुके ।**
**भक्त्या नारायणस्वामी जीवन्मुक्तोऽधुनाऽभवत् ॥**

कृष्णातीरी समाधि घेतलेल्या मौनी स्वामींच्या बद्दल असे सांगतात की त्यांनी बारा वर्षे पर्यंत मौन पाळले होते. या काळात ते कुणाकुणाशी म्हणून बोलले नाहीत. यामुळे त्यांना स्वामी हे नाव पडले. विशेष म्हणजे त्यांनी पायात कोणत्याहि प्रकारची पादत्राणे न वापरता अनवाणीपणे काशी रामेश्वर पर्यंतच्या तीर्थ यात्रा केल्या होत्या.

श्री नरसोबाची वाडी हे कडकडीत जागृत देवस्थान बऱ्याच प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. ख्यातनाम मराठी कवी आणि एकनाथ महाराजांचे नातू श्रीमुक्तेश्वर

यांनी आपल्या महाभारताची मराठी रचना जी केली आहे, तीत ठिकठिकाणी त्यांनी दत्त गौरव महिमा पुढील प्रमाणे गायिला आहे. ते म्हणतात,

**लीला विश्वंभर ईश्वरु । दत्तात्रय जगद्गुरु ।**
**ज्याचे नि नामे भवसागरु । मागा तरले असंख्य ॥**

ते श्रीदत्तात्रेयाच्या लीला विश्वंभर या अवताराचे उपासक होते' मुक्तेश्वरानी आपल्या भावार्थ रामायणाची रचना याच वाडी क्षेत्री केली असा खुद्द मुक्तेश्वरानीच खुलासा करून ठेवला आहे. यामुळे वाडी हे एक साहित्य स्फूर्ति प्रेरणा केंद्र आहे असेहि म्हणावयास हरकत नाही. मुक्तेश्वरानी या बाबतीत म्हटले आहे,

**एका जनार्दना शरण । उत्तर कांड रामायण ।**
**संत कृपेने जाले संपूर्ण । सकळ लोक तारक ॥**
**पवित्र सरिता कृष्णा वेण्णा । पंचगंगा समस्थानी ।**
**नृसिंह सरस्वतींचे चरणी । ग्रंथप्रसाद लाधला ॥**
**तेथ झाली देववाणी । ग्रंथ पावावा प्रतिष्ठानि ।**
**एकनाथचिये सदनी । विस्तारेल जनसुखे ॥**

या मुक्तेश्वरांचे गाव आहे तेरवाड व ते कुरुंदवाडपासून एक मैल अंतरावर आहे. मराठीतील एवढया मोठ्या श्रेष्ठ कवीच्या गावाला भेट दिल्याशिवाय रहावत नाही.

अशी आहे नृसिंहवाडी आणि असा आहे हा तेथला महिमा.

# श्रीसाईनाथ माऊली

जय जय श्रीसाईनाथ माऊली
भक्तांसाठी भूवरी अवतरली
भक्तांच्या अंतरी पूजिलेली
ती माऊली दत्तरुप झाली ॥ १ ॥
तव पदस्पर्शाने पावन झालेली
जयघोषाने शिर्डी दुमदुमली
तव नामात भक्तमंडळी रमली
जय जय श्रीसाईनाथ माऊली ॥ २ ॥
ठेवूनी मस्तक पदकमली
समाधीपुढ दीपज्योत लावीली
गाऊं साई तुझी रे भूपाळी
जय जय श्रीसाईनाथ माऊली ॥ ३ ॥

**रमाकांत पंडित**

# मार्ग धर्म तो

अंतरांत रे हरी ! निरंतर अंतरांत रे हरी ! ॥ ध्रु ॥

चक्रि वादळे, नित्य निर्मिती,
विचार लहरी, मनाभोंवती,
पिंगा करिती, तनु हेलावती —
विविध तऱ्हेनें परी ! निरंतर ...... १

काम क्रोध रिपु, हल्ला करिती,
मनास मनुजा, तव चेतविती,
नानाविध रिति रंगढंग किति —
करिशी वरचेवरी ! निरंतर ...... २

आकारांतहि निराकार जो,
मूर्तीमाजी अमूर्त वसतो,
अनंत असुनी, प्रगटहि असतो,
चराचरांतुनि परी ! निरंतर ...... ३

बंध मुक्त कर, त्वरित निज मना,
सूत्र जागृती, विजयी जीवना,
मार्ग, धर्म तो, स्वरुपीं जाणणा —
सदाचार आचरी ! निरंतर ...... ४

— लक्ष्मीतनया

---

# श्री साईनाथ

श्री ओंकाररूपा जगच्चालका —
साय दुग्धामधली ऐसा भक्तीचा अमृतठेवा
ईश्वर तुम्हीं परि हृदयमंदिरी नित्य राहाता
नासे आमुची इच्छा लालसा, द्वेष कटुता
थबकता, तिष्ठता, देखता तुज दयाघना !

# भक्तसखा ईश्वर

ईश्वर आहे सखा संतजनांचा
पुंडलिकाच्या विटेवरी उभा राहिला साचा ॥ धृ० ॥
धाव घेई जनाईकडे पीठ दळण्याला
धाव घेई सखूकडे सासुरवास भोगाया
असा आहे हा संतजनांचा रक्षणकर्ता ॥ १ ॥
धावी मीरेकडे जहर प्राशाया
धावतो तुकयाकडे ऋण फेडाया
असा आहे हा संतजनांचा अमूल्य ठेवा ॥ २ ॥
देई अढळपद ध्रुवाते, लाड करी प्रल्हादाचे
देई राज्य बिभीषणाते, पुरवी लाड भक्तांचे
असा आहे हा बंधु संतजनांचा ॥ ३ ॥

—श्रीधर प्रभुणे

# स्वप्न

रम्य उषेच्या स्वागत वेळी
विश्वविराट स्वरूपांनी
श्री साईंच्या रुपे आली
मूर्ती मज स्वप्नी ॥ धृ० ॥
मानवदेहिं भव्य शिळेवर ॐकाराहून बसलेला
तीन गुणांच्या ललाट रेषा कपड्याखाली झाकियल्या
हा विश्वेश्वर हा जगदीश्वर देखियला नयनी ॥ १ ॥
भगवीं वस्त्रें अंगावरती लपेटलेली लज्जेपुरती
हास्य मधुर ते वदनावरती ओष्ठ मधुर ते भाव दाविती
हाच मनोहर हा शिवशंकर देखियला नयनी ॥ २ ॥
जात पात ना पंथ न धर्म रामरहीम वा कृष्णकरीम
भेद न दिसला त्याचे ठायी मुक्त करांनी प्रसाद देई
हाच महेश्वर हा करुणाकर देखियला नयनी ॥ ३ ॥
हास्योद्गारे वदती साई अल्ला तेरा भला करेगा
कोई न मेरा भूका रहेगा हा प्रेमाचा निरोप देई
हा देवेश्वर हा जगदीश्वर देखियला नयनी ॥ ४ ॥

—डी. बी. पोतनीस

# आरती साई बाबांची

( चाल :— ॐ नमो जगदीश हरे. भक्त जनों के संकट क्षण में दूर करे । )

ॐ नमो साई देवा, नमो साई देवा ।
ओवी भावी आरती करितो चरणीठाव देई देवा ॥ ध्रुव ॥

प्रथम शिरडी क्षेत्रा आले बालरुपे प्रकट झाले,
ज्ञान-वैराग्य दाखविले नवल वाटले सर्व लोका ॥ १ ॥

मशिदीहुनी लेंडी जाती चावडी येउनि बसति,
सोहळा दाखवी परब्रह्माचा ॥ २ ॥

प्रभात सायंकाल आरती होते भक्त गोळा होती तेथे,
काय वर्णु सोहळा मी ते वर्णीला न जाय ॥ ३ ॥

माधवराव श्यामा सेवा करती गुंग झाली गणुची मती,
साई चरणा न सोडी बायजाबाई मेघा कदा ॥ ४ ॥

या शिरडी क्षेत्राची थोरी शेषथकला न चढे पायरी,
मज पामरा लाभावि थोडी दिन-रात प्रार्थी तो ॥ ५ ॥

शिरडी क्षेत्रा जावे साधु संतांचे दर्शन घ्यावे,
साई चरण न सोडावे, दिनरात जपावे साईचे नाम ॥ ६ ॥

मंदमती क्रियाहीन, आलो तव पाई शरण ॥
शरणांगताचे रक्षण करणे ब्रीद साईचे ॥ ७ ॥

वेडीवाकडी आरती बोलली तुझी तुज अर्पण केली,
रंगदास न मागे काही सेवाही घडावी दिन रात ॥ ८ ॥

जो आरती नित गाई त्यांचे मनोरथ पूर्ण करे साई
विनन्ती असे सर्वांस ही दासचरणी माथा ठेवितो ॥ ९ ॥

—आर. सी. देशमुख

# सुगंध सावली

आलो होतो तुझ्या द्वारीं
आठवतें कां तुला ?
तुझ्या गळीं घातलेला
सुगंधाचा झुला ?

सुगंधाच्या झुल्यावरी
झुले फूल, फूल
माझें मन झालें तेव्हां –
लहानगे मूल

लहानग्या मुलाचें त्या
विश्व निळे, निळे
पिकलेल्या पानांसम
अहंकार गळे

अहंकार गळे तेव्हां –
नातें तुझें जुळे
नाते जुळे तुझ्याशीच
अमृतच मिळे

सुगंधाची सावलीच
पडे माझ्यावर
आणि तुझ्या कानीं पडे
चैतन्याचा स्वर

आलो होतो शिरडीला
आठवतें कां तुला ?
कां रें निळी भुलावण
घातली तूं मला ?

वसंत प्र. जोशी

# " नित्य–सूख "

साई–मुख पाहता होतसे दुःख मनावेगळे ।
दुःखचि सस्ता भार सांडुनि हृदय होई मोकळे ॥ १ ॥
हृदयातिल त्या जागि उमटती साई–पद–कमळें ।
कमळाभवती आनंदाचे भृंग जमति सगळे ॥ २ ॥
प्रेमभराने मधू वेचिती हळूच मग त्यांतले ।
तेहि देवुनि जगाकारणे होती जगावेगळे ॥ ३ ॥
हृदयातिल हे जीवन-संगित नित्य असे चाले ।
अनित्य सोडुनि मिळे सूख तें हेचि नित्यातले ॥ ४ ॥
॥ भगवान श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥

शाम जुवळे

# ओवी

अहिल्या द्रौपदी मंदोदरी सीता ।
वाचे नाम घेता तारतील आता ॥
पतीव्रता धर्म दाविला जयाला ।
माई ठेवी मस्तक साई चरणाला ॥ १ ॥
मोहमाया द्वाड आडवी भक्तीला–
नासके शरीर जाणार लयाला
ओवी गावी आता श्री साईला
माई सांगे माझ्या मायबहिणीला ॥ २ ॥
दत्त साईनाथ भक्तीचा भुकेला
कृपाळू बाबा तो धावे संकटाला
माझी माय तात शिर्डीत पाहिला
दत्त साईनाथ पाहिल माईला ॥ ३ ॥

साईचरणरत

सौ. माई रा. आडकर

# असा माझा देव !

व्याकुळले मन, तुझिया दर्शना
येण्या शिरडीस, मला का जमेना ।
शिरडीच्या घरी, साई बा माऊली
भक्तावरी करी कृपेची सांवली ।
प्रपंच जन्मास, चिकटे सदाचा
परि मनीं ध्यास, साई दर्शनाचा ।
साई माझी आई, बाप तोची जाण
संकटात रक्षी, कशाची ना वाण ।
हिंदू ना मुस्लीम, असा माझा देव
अंतरीचा फक्त पाहे भक्तीभाव ।

विजय द. हजारे

---

# श्रीसाईबाबांच्या समाधीपाशी ....

श्रीसाईंच्या समाधीचे गेलो करण्या दर्शन
पहाताक्षणी ते स्थान उचंबळून आले मन
पाहुन साईंची मूर्ति मीही झालो मूर्ति
या भावड्या मनाला आली काव्याची स्फूर्ति
साईबाबांच्या त्या ठाई बदले भावनेचा नूर
मनाच्या सागराला येतो भक्तिचाच पूर
रहातात उभ्या साऱ्या घडलेल्या गोष्टी
मनाच्या पाखराला मिळे भावनेची पुष्टी
मनाच्या द्वारा कित्येक विचार येतात
भावनेने ओथंबून भक्तिरुप ते होतात
पाहुनिया सर्व शिर्डी देह वाटे धुलीकण
भक्तिच्या भावनेने पुलकित होते मन
भक्तांचा कैवारी साई दर्शन त्याचे घडले
आनंदाचे दोन अश्रु पटकन खाली पडले
एकाएकी मी धरले श्रीसाईंचे चरण
चरण सोडण्यास तयार नव्हते हे मन

शिवाजी कौ. मोरे

# शिरडी–वृत्त–माहे आक्टोबर १९७४

## दसरा उत्सव

या महिन्यात श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी–उत्सव आल्यामुळे बाहेरगावचे साईभक्तांची गर्दी बरीच होती. उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला.

दसरा उत्सव १ ला दिवस :– गुरुवार दि. २४–१०–७४ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. गुरुवारचा महत्त्वाचा दिवस व उत्सव त्यामुळे मोठ्या संख्येने साईभक्त आरतीला उपस्थीत होते. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधि मंदिरात सकाळी ६–३० वा. श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. डॉ. प्रा. नारायणराव राजदेरकर एम. ए. पी. एच्. डी. औरंगाबाद यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्यावर ७–३० ते ९ वाजेपर्यंत व ९–३० ते ११ पर्यंत मुंबई नभोवाणीचे कलाकार व प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. जितेंद्र अभिषेकी यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९–१५ ते ११–४५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक वाद्यांच्या गजरात गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

दसरा उत्सव २ रा दिवस :— शुक्रवार दि. २५–१०–७४ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती झाली. नंतर श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. मा. रिसीव्हर का. सी. पाठक साहेब यांनीं स्वतः झोळी घेऊन उपस्थीत साईभक्तांना झोळ्या दिल्या. शिर्डी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा, आरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळीं १० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन औरंगाबाद ह. भ. प. डॉ. प्रा. राजदेरकर एम्. ए. पी. एच्. डी. यांनी केले. त्यानंतर माध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी १ ते ३ पर्यंत श्रींचा आराधना विधी कार्यक्रम श्री. का. सी. पाठक रिसीव्हर यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राह्मणांना धोतर, उपरणे व सुवासिनींना खण दिले. सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्याठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन झाल्यावर सोने

लुटण्याचा कार्यक्रम झाला. धार्मिक पूजा विधी कार्यक्रम मा. रिसीव्हर साहेब यांचे शुभ हस्ते झाला त्यानंतर उपस्थीत मंडळींनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

सायंकाळी धुपारती झाल्यावर ७–३० ते ९ वाजेपर्यंत व ९–३० ते ११ वाजेपर्यंत नगर येथील गंधर्व गायकीचे श्री. रुस्तुमकाका हाथीदास यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्री ९–१५ ते १ वाजेपर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली होती. मिरवणूकीला मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बॅण्ड पथक अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक राहाता व पिंपळवाडी येथील बॅण्ड पथके मिरवणुकीबरोबर होती. भजन वगैरे कार्यक्रमही झाले. प्रतिवर्षाप्रमाणेच पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून करमणुकीचे कार्यक्रम केले. त्याचप्रमाणें स्थानिक लोकांनीं भारुडगारुड कार्यक्रम केले. मिरवणुक १ वाजतां मंदिरात आली व भक्तमंडळींनी कलाकारांच्या गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

दसरा उत्सव तिसरा दिवस :– शनिवार दि. २६–१०–७४ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाण सकाळीं ७–३० ते ८–३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ डॉ. नारायणराव राजदेरकर यांचे कीर्तन झाले. शेजारती झाल्यावर दसरा उत्सवासाठी संस्थानने आयोजित केलेले स्थानिक कलाकार श्री. सुरेश शिरगावकर यांनीं "एखाद्याचे नशिब" या नाटकाचा प्रयोग अत्यंत कलात्मकतेने सादर केला.

दसरा उत्सव चौथा दिवस :– रविवार दि. २७–१०–७४ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त १० ते १२ वाजेपर्यंत श्री. राजदेरकर व श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने झाली. काला कीर्तन झाल्यावर दही हंडी कार्यक्रम होऊन माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्री ७–३० ते १० वाजेपर्यंत सिने-पार्श्वगायक श्री. जयवंत कुळकर्णी यांचे गायन झाले. नंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

कोजागिरी पौर्णिमा :– रात्री १० ते १२ श्रींची पूजा व चंद्रपूजा मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे हस्ते झाली. उपस्थीत भक्तमंडळीना दूध, पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. तसेंच डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. नंतर त्यांच्या सहकाऱ्यानी भजन, गायन, वादन व करमणुकीचे कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

काही कलाकरांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. त्यांचीं नावे खालील प्रमाणे :—

**कीर्तन :** ( १ ) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली. ( २ ) ह. भ. प. विश्राम बुवा लक्ष्मीवाडी. ( ३ ) ह. भ. प. डॉ. प्रा. नारायणराव राजदेरकर एम्. ए. पी. एच. डी. औरंगाबाद. (४) श्री. जाधव महाराज ( बीड )

**प्रवचन :** (१) श्री. वसंत सखाराम बाबरे मुंबई.

**भजन :** (१) सत्यसाई सेवा समिती, देवळाली (२) श्री. एस. के. दुबे भजन मंडळ, मद्रास. ( ३ ) सी. के. पी. महिला मंडळ, दादर, मुंबई. ( ४ ) नवरंग भजन मंडळ पुणें.

**गायन, वादन नृत्य वगैरे.** ( १ ) लोकमान्य कला पथक, नासिक. ( २ ) श्री. केदार सिंग, बेळगाव. ( ३ ) श्रीमती नमिता गांगुली, ओरीसा. ( ४ ) कु. संदीप गांगुली. ( ५ ) श्री. स्वामी रामानंद, बेळगाव. ( ६ ) श्रीराम वि. सातडेंकर, मुंबई. ( ७ ) जितेंद्र अभिषेकी, लोणावळा. ( ८ ) श्रीं. पुरुषोत्तम वालावलकर, मुंबई. ( ९ ) राजा प्र. काळे, औरंगाबाद. ( १० ) श्री. मंगेश मो. मुळे, मुंबई. ( ११ ) श्री. वसंतराव खेडगीकर, मुंबई. ( १२ ) सौ. गीता दिक्षित, मुंबई. ( १३ ) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. (१४) श्री. दत्तोबा गुरव, शिर्डी. ( १५ ) सौ. शकुंतला मो. जोशी, नासिक. (१६) सौ. शरयु मराठे, शिर्डी. ( १७ ) श्री. सुधीर रानडे, मुंबई. ( १८ ) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. ( १९ ) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. (२०) श्री. प्रदीप वि. देशपांडे, मुंबई. ( २१ ) श्री. शंकरराव सालकर, कोपरगाव. ( २२ ) श्री. नामदेव ना. भोईर, कुलाबा. ( २३ ) श्री. शिवाजी तु. धुमाळ, शिर्डी. ( २४ ) श्री. चंपतराव मुळे, औरंगाबाद. (२५) पंढरीनाथराव देवगिरीकर, औरंगाबाद. ( २६ ) श्री. दामूअण्णा दळवी, श्रीरामपूर. ( २७ ) कु. मंगला ग. जोशी, शिर्डी. (२८) श्री. देवीदास रा. अत्रे, औरंगाबाद. ( २९ ) श्री. नरहरी रा. कवीश्वर, इन्दौर. (३०) स्वामी रामानंद, बेळगाव. (३१) श्री. पी. व्ही. नायडू, रायपूर. (३२) श्री. बंडोबा जाधव, पुणे. (३३) श्री. बाळाजी पि. गुरव, शिर्डी. (३४) श्री. गंगाधर भा. भागवत, पुणे. (३५) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, शिर्डी. (३६) श्री. शाम नवशेर इराणी, नगर. (३७) श्रीपाद भा. कुळकर्णी, सावळीविहीर. ( ३८ ) श्री. रुस्तुम काका हाथीदास, अ. नगर. ( ३९ ) श्री. मानिखाशा रु. हाथीदास. अ. नगर. ( ४० ) सौ. शिला रु. हाथीदारू. (४१) श्रीकृष्ण बॅंडपथक, मुंबई. (४२) कु. शुभा जोशी, मुंबई. ( ४३ ) श्री. मनोहर रेगे, मुंबई. ( ४४ ) श्री. मल्हारी कुलकर्णी, मुंबई. ( ४५ ) श्री. सुहास कर्वे, मुंबई. ( ४६ ) कु. हेमा आंबेकर, मुंबई. ( ४७ ) कु. रेगे, मुंबई. (४८) सौ. जोशी, मुंबई. (४९) श्री. राजदेरकर, औरंगाबाद. (५०) श्री. पंडितराव, काळे. (५१) सौ. राजदेरकर, औरंगाबाद. (५२ कु. अंजू राजदेरकर, औरंगाबाद. (५३) सिने पार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. (५४) सौ. पुष्पा पागधरे, मुंबई.

(५५) श्री. शशिकांत पुसाळकर, मुंबई. (५६) श्री. दिनानाथ डी. वस्लीकर, मुंबई. (५७) श्री. दीपक ख. बोरकर, मुंबई. (५८) श्री. विधाते पंडित, मुंबई. (५९) श्री. प्रभाकर पंडित, मुंबई. (६०) श्री. बाळ साठे, मुंबई. (६१) श्री. देवासकर गुरुजी, मुंबई. (६२) श्री. वसंतकुमार, मुंबई. (६३) श्री. जयंत शेवडे, मुंबई. (६४) कु. पद्मजा कोटस्थाने, शिर्डी. (६५) श्री नागरे, शिर्डी. (६६) श्री. रामचंद्र केशव काळे, नागपूर.

**कोजागिरी पौर्णिमेस कार्यक्रमास आलेले कलाकार :**

(१) डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. इतर कलाकार मुंबई. (२) श्री. आप्पा सामंत, (३) श्री. विनायक लाड (४) श्री. विलास दिवे (५) श्री. अनंत पांचाळ (६) श्री. सुरेश पांचाळ (७) श्री. रवींद्र पांचाळ (८) श्री. रामचंद्र बोभाटे (९) श्री. सुधाकर पाटील (१०) श्री. अजित देवरुखकर (११) श्री. सुभाष सामंत (१२) श्री. वसंत गव्हाणकर (१३) श्री. जे. गोपीनाथ (१४) कु. उषा माळवी (१५) श्री. केदारनाथ गोडे (१६) श्री. पुसाळकर.

**एखाद्याचे नशीब**–नाटक :— बाळ कोल्हटकर कृत.

**दिग्दर्शक :**— सुरेश शिरगांवकर.

**कलाकार :**— (१) कु. ज्योति चांदेकर (२) श्री. नारायणराव आमले (३) श्री. कोते गुरुजी (४) श्री. ज्ञानेश्वर वैद्य (५) श्री. गणपत गोंदकर (६) सौ. संगीता शिरगांवकर (७) श्री. सुरेश शिरगांवकर (८) श्री. दाजीबा पाटील.

**माननीयांच्या भेटी :**

(१) मा. श्री. सक्सेना साहेब I. A. S. सेक्रेटरी टॅरिफ कमिशन्, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(२) मा. श्री. शंकररावजी चव्हाण (शेतकी मंत्री महाराष्ट्र राज्य. मुंबई)

(३) मा. श्री. मूनसाहेब (कॉन्झरवेटर ऑफ फॉरेस्ट महाराष्ट्र राज्य, मुंबई)

(४) मा. श्री. वसंतदादा पाटील (पाटबांधारे मंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई)

(५) मा. श्री. रुपवते (राज्यमंत्री समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, मुंबई)

(६) मा. श्री. दत्ताबाळ, मुंबई.

(७) श्री. वागळे (हायकोर्ट जज्ज, मुंबई)

(८) मा. श्री. ल्हासाहेब I.A.S. (सेक्रेटरी शेतकी खाते महाराष्ट्र राज्य, मुंबई)

**हवापाणी :**— शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

Regd. No. MH/BYE/26

## श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

### श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किमती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित ( मराठी ) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित ( इंग्रजी ) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित ( गुजराती ) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित ( हिंदी ) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित ( कानडी ) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् ( तेलगू ) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि ( मराठी ) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय ( मराठी ) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना ( मराठी किंवा गुजराती ) | रु. | ०-२० |
| १०. | श्री प्रधानकृत चरित्र ( इंग्रजी ) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत ( मराठी ) | रु. | २-०० |
| १२. | श्री साईलीलामृत ( हिंदी ) | रु. | २-५० |
| १३. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १४. | शीलधी ( मराठी ) | रु. | ०-२० |
| १५. | साईबाबा : अवतार कार्य ( अ. य. धोंड ) | रु. | १-७५ |
| १६. | शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा आल्बम ) | रु. | २-०० |
| १७. | श्री साईलीला मासिक ( मराठी किंवा इंग्रजी ) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास— | रु. | ०-६० |
| १८. | मुलांचे साईबाबा ( द. दि. परचुरे ) ( मराठी ) | रु. | ०-५० |
| १९. | गुजराथी पोथी ( शरणानंद ) | रु. | ५-५० |

☆

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :—४०० ०१४.

मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई—३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई—१४